

डिसेंबर २०१८

# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक










ANNAPURNA PARIWAR

# अनुक्रमणिका


* संपादकीय

* संविधान बचाव!
जनतेचे लोकशाही हक्क बचाव!!

*–कॉ. सुरेश धोपेश्वरकर*

* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटना
समिती समोरील शेवटचे भाषण:

* नेहरू एकटे व एकाकी होते तेव्हा...

*– सुरेश द्वादशीवार*

* भारतीय परिवर्तनाचा प्रश्न व
गांधी-आंबेडकर-मार्क्स समन्वय!

*– डॉ. भालचंद्र कानगो*

* संविधानाचे रक्षण कोण व कसे करणार?

*– सुभाष वारे*

* 'इस्लामफोबिया'चा पर्दाफाश करणारा 'मुल्क'

*– लक्ष्मीकांत देशमुख*

* स्वातंत्र्याची चोरी *– हिनाकौसर खान*

* आंतरजातीय विवाह व जातिनिर्मूलन *– सुरेश सावंत*

* ॲग्री इंडियन गॉडेसेस... *– श्रुती गणपत्ये*

* सुकरवाट *– वृषाली मगदूम*

* अन्नपूर्णा परिवार वृत्त विशेष *– अंजली दिवाण पाटील*

* माझे मनोगत *– श्रुतिका सुरेश साळवी*

* पितृ देवो भवो! *– रोहिणी चव्हाण*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **श्यामला पवार**
- **बाळासाहेब पिसाळ**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

## संविधान बचाव!
## जनतेचे लोकशाही हक्क बचाव!!

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे झुंजारपणे नेतृत्व करणारे महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मदिनाचे हे वर्ष. सत्य अहिंसेचे, स्वावलंबी जीवनाची आणि निर्भयतेची मूल्ये शिकविणारे लहान थोर भारतीयांचे लाडके बापूजी. गांधीजींच्या कालांतीत उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला 'संवाद' आणि 'अन्नपूर्णा परिवारातर्फे' आदरपूर्वक प्रणाम.

१४ नोव्हेंबर पंडित जवाहरलाल नेहरुंचा जन्मदिन स्वातंत्र्य चळवळीतील १० वर्षांहून अधिक काळ कारागृहात राहिलेले भारतीय जनतेचे आदरणीय आणि लाडके पंतप्रधान स्वतंत्र भारतात लोकशाही मजबूत करण्यासाठी ज्यांनी संस्थात्मक रचना उभी केली ते स्वतंत्र भारताचे आद्य शिल्पकार. लहान मुलांचे चाचा नेहरू. यांना 'संवाद' आणि 'अन्नपूर्णा परिवारातर्फे' विनम्र अभिवादन.

६ डिसेंबर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन. स्वातंत्र्य चळवळीतील मूल्यांना, गांधी, नेहरूंच्या उदारमतवादी दृष्टिकोनाला ज्यांनी भारतीय संविधानात शब्दबद्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना घटनेच्या शिल्पकारांना संवाद आणि अन्नपूर्णा परिवारातर्फे आम्ही कृतज्ञतापूर्वक वंदन करतो.

भारतीय संविधानानुसार २०१४ साली निवडून आलेले नरेन्द्र मोदी सरकार संविधानाने निर्माण केलेल्या विविध संस्थांच्या कारभारात प्रसन्नपणे हस्तक्षेप करून त्यांची मोडतोड करीत आहे. सी.बी. आय., आर. बी. आय. कॅग, न्यायाधीशाच्या नेमणुका, विद्यापीठातील हस्तक्षेप, इतिहासाचे अनैतिहासिक पुनर्लेखन ही त्याची पृष्ठभागांवर आलेली उदाहरणे आहेत. धर्मनिरपेक्ष समाजवादी लोकशाही भारतीय प्रजासत्ताकाच्या जागी धर्मावर आधारलेले 'हिंदू राष्ट्र' स्थापण्याचा छुपा डाव आहे. राम मंदिराचे नाव हा कावा आहे. शबरीमला मंदिरात सुप्रीम कोर्टाने परवानगी देऊनसुद्धा महिलांना भक्तांनी दांगगाईने, बळजबरीने रोखणे, आणि हिंदूवरच अन्याय का? श्रद्धा आणि परंपरा यामध्ये

न्यायालयाने ढवळाढवळा करावी का? असे बुद्धिभेद करणारे प्रश्न सत्ताधाऱ्याकडून विचारले जात आहेत. अराजकवादी, धार्मिक उन्मादवादी शक्तींना प्रोत्साहन दिले जात आहे.

या अंकात म्हणूनच आम्ही घटना समितीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी केलेले भाषण संक्षिप्त स्वरूपात दिले आहे. तसेच सुभाष वारे आणि सुरेश सावंत यांचे संविधान आणि त्यातील मूल्ये या विषयींचे लेख दिले आहेत.

सुरेश द्वादशीवार यांचा साधना दिवाळी अंकातील पंडित नेहरूवरील लेख या अंकात छापला आहे.

गांधी-आंबेडकर मार्क्स समन्वय हा कॉ. डॉ. भालचंद्र कानगो यांचा लेख छापला आहे.

या अंकात आम्ही 'मुल्क' या चित्रपटावरील श्री लक्ष्मीकांत देशमुख – अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यांचा लेख प्रसिद्ध करीत आहोत. जसजसे निवडणुकांचे वारे तीव्रपणे वाहू लागतील तसतसे धार्मिक उन्मादाचे, दुहीचे, तेढीचे, प्रसंगी हिंसांचाराचे वातावरण निर्माण केले जाईल, तापविले जाईल. ''धार्मिक सलोखा राखा.'' ''जात धर्मावरून वस्ती पातळीवर किंवा शहरांत तणाव निर्माण करू नका.'' हीच तर आपल्याला संविधानाची शिकवण आहे. तोच तर गांधी, नेहरू, आंबेडकरांनी आपल्याला दिलेला शहाणपणाचा सल्ला आणि वारसा आहे. तो वारसा जपणे हे अन्नपूर्णा परिवाराचे ध्येय आहे. त्यासाठी तर 'संवाद' हे आपले त्रैमासिक आहे.

इराणमधील महिलांनी बुरख्याच्या सक्ती विरुद्ध कशी चळवळ चालविली याची माहिती देणारा 'हिना कौसर खान' यांचा लेख छापला आहे. त्या आपल्या पुण्यातील आहेत.

महिलांची जी लैंगिक छळवणूक होते त्या विरुद्ध सिनेमा आणि वृत्तपत्रात काम करणाऱ्या महिलांनी 'मी टू' ही चळवळ चालविली. एम. जे. अकबर या केन्द्रीय मंत्र्यांनी राजीनामा दिला आहे आणि तक्रारदाराविरुद्ध कोर्टात बेअब्रू झाल्याचा दावा दाखल केला आहे. या निमित्त राइट अँगल या web portal वर प्रसिद्ध झालेल्या श्रुती गणपत्ये यांचा लेख छापला आहे.

श्रीमती वृषाली मगदूम यांचा माध्यमावरील आणि विशेषत: मालिकावरील लेख विचारांना चालना देणारा आहे.

अंजली पाटील यांचा अन्नपूर्णाच्या कार्यासंबंधीचा लेख छापला आहे.

'संवाद'चा अंक क़सा वाटला, त्यातील कोणता लेख आवडला आणि का आवडला, नापसंत असल्यास काय आवडले नाही ते संपादक मंडळास अवश्य कळवा.

या अंकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण आणि 'मुल्क' सिनेमा वरील लेखाचे वस्ती पातळीवरील सभेत सामुदायिक वाचन करावे. विशेषत: १८ ते ३० या वयोगटातील मुलामुलींच्या प्रतिक्रिया घ्याव्यात त्या मार्च महिन्याच्या अंकात अवश्य छापू. स्वतंत्र भारतातील संवेदनशील, प्रयोगशील, सहिष्णू नवसमाज निर्मितीसाठी संविधानाने दिलेल्या हक्काची आणि कर्तव्यासंबंधी सातत्याने जाणीव जागृती वाढवूया.

❐

**''भारत त्या सर्व लोकांचा आहे जे इथे जन्मले आणि वाढले. त्यामुळे तो जेवढा हिंदूंचा आहे तेवढाच पारशी, ज्यू, ख्रिश्चन, मुसलमान इ. चा आहे. स्वतंत्र भारतामध्ये हिंदूंचे नाही तर भारतीयांचे राज्य चालेल व ते कुठल्याही धार्मिक पंथ वा संप्रदायाच्या बहुमतावर नाही, तर धार्मिक भेदभावाशिवाय, सर्व जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालेल. धर्म हा वैयक्तिक विषय आहे. त्याला राजकारणात कुठलेही स्थान असता कामा नये.''**

**- महात्मा गांधी**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घटना समिती समोरील शेवटचे भाषणः

## (संपादित अंश)

**२५ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना राष्ट्राला अर्पण करताना घटना समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे शेवटचे भाषण केले त्याचा संपादित अंश.**

आज माझ्या मनात भारताच्या भवितव्याविषयी जे विचार आहेत त्यांची अभिव्यक्ती केल्याशिवाय राहवत नाही. दि. २६ जानेवारी १९५० रोजी हा देश स्वतंत्र (प्रजासत्ताक) होईल परंतु त्यांच्या स्वातंत्र्याचे काय होईल, तो आपले स्वातंत्र्य टिकवू शकेल की पुन्हा गमावून बसेल, या विचाराने मी अस्वस्थ होतो. भारत पूर्वी कधी स्वतंत्र नव्हता असे नाही; परंतु भारताने एके काळी त्यांचे स्वातंत्र्य गमावलेले होते. तो आपले स्वातंत्र्य पुन्हा दुसऱ्यांदा तर गमावून बसणार नाही ना? हा विचार मनात येताच भवितव्याच्या दृष्टीने मी चिंताग्रस्त बनतो. भारत त्याच्या इतिहासात स्वातंत्र्य गमावून बसला, कारण आपल्याच काही लोकांनी त्याचा केसाने गळा कापला होता, विश्वासघात केला होता. हा विचार नुसता माझ्या मनात जरी आला, तरी मी बेचैन होऊन उठतो. महंमद-बिन-कासीमच्या आक्रमणाच्या वेळी डहार राजाच्या सेनापतीनेच महंमद-बिन-कासीमच्या हस्तकाकडून लाच घेतली आणि आपल्याच सम्राटाच्या बाजूने लढण्यास नकार दिला. महंमद घोरीला जयचंदानेच भारतावर आक्रमण करण्याचे आमंत्रण दिले आणि पृथ्वीराज चव्हाणाच्या विरोधात सोळंकी राजाचे साहाय्य देण्याचेही वचन दिले. एकीकडे छत्रपती शिवाजी हिंदूंच्या मुक्तीसाठी लढत होता, तर दुसरीकडून उच्चकुलीन मराठे आणि रजपूत राजे रणांगणावर मोगल सुलतानांच्या बाजूने लढत होते. जेव्हा ब्रिटिशांनी शिखांना उद्ध्वस्त करायचे ठरविले, तेव्हा शिखांचा सरसेनापती गुलाबसिंग शांत बसला. त्याने शिखांचे राज्य वाचविण्यासाठी किंचितही मदत केली नाही. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात तर शिखांनी केवळ प्रेक्षकाचीच भूमिका घेतली.

**''या इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय, या विचाराने आज माझे अंत:करण अस्वस्थ होते. याबरोबरच जाती आणि धर्मपंथांच्या रूपात वास्तवात असलेले आपले जुने शत्रू आणि त्यांच्या आधारावर उभे केलेले परस्परविरुद्ध तत्त्वज्ञान असलेले आपले राजकीय पक्ष यांची जाणीव झाल्यानंतर तर ही अस्वस्थता अधिक बेचैन करते.** भारतीय लोक आपापल्या संप्रदायापेक्षा भारताला श्रेष्ठ मानतील, की आपले संप्रदाय भारतापेक्षा श्रेष्ठ स्थानावर नेऊन बसवतील, ते मला आज सांगता येणार नाही. परंतु भारतीयांनी जर आपल्या राजकीय संप्रदायांना भारतापेक्षाही श्रेष्ठ मानले, तर आपण आपले स्वातंत्र्य पुन्हा दुसऱ्यांदा धोक्यात आणू आणि कदाचित ते कायमचेच हरवून बसू. या प्रकारच्या कृत्यापासून आपण आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण सर्वसामर्थ्यानिशी केले पाहिजे. रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपण स्वातंत्र्याच्या संरक्षणाचा निर्धार केला पाहिजे.''

**''दि. २६ जानेवारी १९५० पासून भारत लोकशाहीवादी राज्य बनेल. याचा अर्थ भारतीय शासन जनतेचे, जनतेकडून आणि जनतेसाठी कार्य करणारे असे त्याचे स्वरूप त्या दिवसापासून होईल. हा विचार माझ्या मनात आला की, मला ''या लोकशाहीवादी राज्यघटनेचे काय होईल, याची चिंता ग्रासते.** या राज्यघटनेच्या रूपाने मिळालेल्या लोकशाहीचे भारत संरक्षण करू शकेल की लोकशाहीलाही तो पुन्हा मुकेल?'' या विचाराने स्वातंत्र्याच्या भवितव्याच्या विचाराइतकाच मी अस्वस्थ होतो. भारताला त्याच्या इतिहातासात लोकशाहीची परंपरा नव्हती असे नाही... परंतु भारत ती गमावून बसला होता. या राज्यघटनेने

मिळालेली लोकशाही तो पुन्हा गमावून बसेल काय? हेही आज मला सांगता येणार नाही. लोकशाहीची परंपरा दीर्घकाळ खंडित झालेल्या भारतासारख्या देशात असे घडणे सहज शक्य आहे. कारण त्यामुळेच ती भारतीयांना नवीन वाटण्याची शक्यता आहे. अनेक वर्षे अंगवळणी पडलेली हुकूमशाही लोकशाहीची जागा घेण्याचा धोका आपल्यासमोर आहे. राज्यघटनेने प्राप्त झालेल्या या लोकशाहीचा सांगाडा कदाचित भारतीयांना टिकविणेही शक्य होईल, पण या सांगाड्यात हुकूमशाहीच्या वास्तवाचा आत्मा संचार करू शकेल. जर भारतात प्रचंड राजकीय उत्पात घडला, तर दुसऱ्या शक्यतेच्याच वास्तवाला अधिक संधी प्राप्त होईल.

"जर आपल्याला लोकशाहीच्या केवळ सांगाड्याचेच नव्हे, तर लोकशाहीच्या वास्तवाचेही संरक्षण करावयाचे असेल, तर आपण काय केले पाहिजे? माझ्या मते, आपली सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे गाठण्यासाठी पहिल्यांदा सर्व घटनात्मक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. याचा अर्थ, आपण रक्तरंजित क्रांतीचा मार्ग त्यागला पाहिजे. आपण सविनय कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रहाचे मार्ग सोडून दिले पाहिजेत. जोपर्यंत असले सामाजिक आणि आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी घटनात्मक मार्ग उपलब्ध नव्हते, तोपर्यंत सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी घटनाबाह्य मार्गांचे समर्थन करता येणे शक्य होते. जिथे घटनात्मक मार्ग उपलब्ध असतात तिथे घटनाबाह्य मार्गांचे समर्थन करणे अवघड असते. हे घटनाबाह्य मार्ग म्हणजे राजकीय अराजकाला आमंत्रण आहे. म्हणून ते जितक्या लवकर थांबविता येतील तितक्या लवकर थांबविले पाहिजेत, त्यातच आपले भले आहे."

"आपण दुसरी महत्त्वाची गोष्ट केली पाहिजे; ती ही की, ज्यांना लोकशाहीचे संरक्षण करावयाचे आहे त्यांनी प्रसिद्ध राजकीय विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल यांनी या दृष्टीने दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्याकडे गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. **आपले स्वातंत्र्य एखाद्या महापुरुषाच्या चरणावर वाहणे किंवा तो लोकशाही संस्थाच उखडून टाकू शकेल इतपत त्याच्यावर विश्वास टाकणे" या वृत्तीपासून सावध राहण्याचा हा इशारा आहे.**

ज्यांनी राष्ट्रासाठी आपले जीवन समर्पित केलेले असते त्या महापुरुषांबद्दल मनात आदरभाव असणे यात काहीही चूक नाही. परंतु त्यांच्याबद्दलच्या उपकृत भावनेलाही मर्यादा असतात. प्रसिद्ध आयरिश राष्ट्रभक्त डॅनिअल ओ कॉनेल याने म्हटल्याप्रमाणे, **"आपल्या स्वाभिमानाची किंमत देऊन कोणताही माणूस उपकृत राहू शकत नाही, आपल्या शीलाची किंमत देऊन कोणतीही स्त्री उपकृत राहू शकत नाही आणि कोणतेही राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याची किंमत देऊन उपकृत राहू शकत नाही."** हा इशारा अन्य कोणत्याही देशापेक्षा भारताने अधिक लक्ष देण्यासारखा आहे. कारण, भारताला **'भक्ती'**ची परंपरा आहे, **'सर्वस्व त्यागाची'** परंपरा म्हणतात तीही आहे आणि जागतिक स्तरावरील अन्य कुठल्याही देशात दृष्टोत्पत्तीस येणार नाही अशा **'विभूतिपूजेच्या'** स्तोमाने भारतीय राजकारणात अतुलनीय भूमिकाही बजावलेली आहे. धार्मिक जीवनातील भक्ती हा आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग कदाचित असू शकेल; **परंतु राजकारणातील भक्ती किंवा विभूतिपूजा हा निश्चितपणे अवनतीकडे नेणारा आणि परिणामी हुकूमशाहीकडे नेणारा मार्ग आहे.**

"आपण तिसरी महत्त्वाची गोष्ट केली पाहिजे; ती ही की, आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट राहता कामा नये. आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचे रूप दिले पाहिजे. सामाजिक लोकशाहीच्या पायाविना राजकीय लोकशाही टिकत नसते. परंतु सामाजिक लोकशाही म्हणजे तरी कशी असते? "सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा आपली जीवनमूल्ये म्हणून स्वीकार करणे होय. या त्रिमूल्यांतून कोणतेही एक मूल्य तुम्हाला अलग करता येणार नाही. या प्रत्येक मूल्याला या तीन मूल्यांच्या एकत्रित सहअस्तित्वातच वास्तव्य आहे. त्यातून कोणतेही एक मूल्य जरी बाजूला काढले, तरी लोकशाहीच्या उद्दिष्टांवरच घाव घातला जातो. स्वातंत्र्याला समतेपासून आणि समतेला स्वातंत्र्यापासून अलग करता येत नसते आणि स्वातंत्र्य आणि समतेला बंधुत्वापासून तोडता येत नसते. **समतेशिवाय असलेले स्वातंत्र्य हे थोड्या वरिष्ठ लोकांचे बहुसंख्य जनतेवर वर्चस्व प्रस्थापित करू शकते. स्वातंत्र्याशिवाय असलेली समता व्यक्तीच्या वैयक्तिक प्रेरणाच मारून टाकते. बंधुत्वाशिवाय असलेले स्वातंत्र्य आणि समता या अस्वाभाविक गोष्टी ठरतील'** त्यांना वास्तवात आणणारी शक्ती आपल्याजवळ असणे आवश्यक आहे. भारतीय समाजातील दोन उणिवांचे भान आपल्याला सत असले पाहिजे. त्यांपैकी एक समता आहे. आपल्या समाजात सामाजिक स्तरावर श्रेणीबद्ध विषमता होती. काही उच्चस्थानी विराजमान होते, तर काही अधोगतीला लागलेले होते. आर्थिक स्तरावर काही धनदौलतीने संपन्न होते, तर काही पूर्ण दरिद्री जीवन जगत होते. **दि. २६ जानेवारी १९५० रोजी आपण विसंगत अंतर्विरोधी जीवनाला प्रारंभ करणार आहोत. आपणास या दिवशी राजकीय समता प्राप्त होईल, परंतु आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता तशीच शिल्लक असेल. आपण राजकीय जीवनात "एक मनुष्य एक मत " हे तत्त्व स्वीकारू आणि प्रत्येक मताचे मूल्य समान मानू. परंतु आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपल्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेमुळे आपण 'एक मनुष्य एक मूल्य' या तत्त्वाला सतत विरोध करत असू. आपण हे अंतर्विरोध, विसंगत जीवन किती दिवस जगणार आहोत? आपण किती दिवस आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात समतेला नाकारणार आहोत? आपण हे दीर्घकाळ चालू ठेवले, तर आपण आपल्या राजकीय लोकशाहीलाही धोक्यात आणू.** आपण हे अंतर्विरोध लवकरात लवकर मिटविले पाहिजेत. अन्यथा घटना परिषदेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेला हा राजकीय लोकशाहीचा ढाचा, जे समूह या विषमतेचे बळी ठरतील, तेही राजकीय लोकशाहीच उद्‌ध्वस्त करून टाकतील.

❒

# नेहरू एकटे व एकाकी होते तेव्हा...

■ सुरेश द्वादशीवार

नेहरू ज्या दिवशी भारताचे पंतप्रधान झाले त्या दिवशी ते खऱ्या अर्थाने एकटे व एकाकी झाले. पूर्वी साऱ्या राजकीय निर्णयांचा भार गांधीजींच्या शिरावर असायचा. सोबत सरदार, राजेंद्रबाबू, राजाजी यांसारख्या दिग्गजांची वर्किंग कमिटी असायची. त्यामुळे निर्णयांच्या चांगल्या व वाईट अशा सगळ्या परिणामांची जबाबदारी त्या साऱ्यांत वाटली जायची. त्यातही सर्वाधिक भार गांधीजींच्या माथ्यावर जायचा. आता नेहरू सरकारचे सर्वोच्च प्रमुख होते. सरकार व प्रशासनातील सर्वोच्च शिखरावर होते आणि शिखरावर जागा नेहमीच फार थोडी असते. त्यावर जेमतेम एखाद्यालाच व तेही कसेबसे राहता येते. त्यामुळे पंतप्रधानपदाचा कार्यकाठ हा नेहरूंसाठी केवळ सन्मान व अधिकारशाहीचा काळ नव्हता. प्रत्येक दिवसागणिक एक नवीन परीक्षा घेणारा व त्या परीक्षेचा निकाल तात्काळ साऱ्या देशाच्या मन:पटलावर उमटविणारा आणि त्यातल्या यशापयशाचे माप त्यांच्या पदरात टाकणारा होता.

गांधीजी देशातल्या दंगली शमविण्यात गुंतले होते. सरदारांसह अन्य नेते त्यांच्यावरील नव्या जबाबदाऱ्या समजून घेण्यात व त्या निकालात काढण्यात गढले होते. पंतप्रधानाचे पद त्या साऱ्यांना मार्गदर्शन करणारे, त्यांच्या कामावर नजर ठेवणारे, त्यातल्या चुका दुरुस्त करणारे आणि त्यातल्या योग्य बाबींना प्रोत्साहन देणारे होते. शिवाय त्यांच्या पदावर शेजारी देशांशी संबंध राखावयाचा व दूरस्थ शक्तींशी जुळविण्याचा भार होता. जगातल्या कोणत्याही देशाच्या प्रमुखाला एवढे सारे करावे लागतेच. मात्र नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाच्या नेत्यावर या साऱ्या गोष्टींसोबतच देश जपण्याचे, लोकमानस राजी राखण्याचे, प्रशासनाला नेतृत्त्व देण्याचे, लोकशाही रुजविण्याचे, तिला आधार देणाऱ्या घटनेच्या अंमलबजावणीचे आणि जुन्या सत्ताधाऱ्यांहून आपल्या सत्तेचे स्वरूप वेगळे व स्वतंत्र राखवण्याचेही उत्तरदायित्व असते. त्यातून नेहरूंच्या हाती आलेला देश साधा नव्हता. तो उपाशी होता. स्वातंत्र्याचा दिवस उजाडण्याच्या पाचच वर्षे आधी बंगालमध्ये पडलेल्या दुष्काळात ४० लाखांहून अधिक माणसे अन्नावाचून तडफडून मेली होती. कलकत्त्याच्या रस्त्यावर मरून पडलेल्या अभाग्यांची प्रेते उचलून शहराबाहेर नेण्याच्या कामी शेकडो मालमोटारी लागल्या होत्या. दुष्काळ देशाच्या पाचवीलाच पूजला होता. सामान्यपणे दर तीन वर्षांनी देश दुष्काळाला सामोरा जात होता. त्यातून देशाच्या पंतप्रधानाची पहिली जबाबदारीही निश्चित होत होती.

स्वातंत्र्याच्या आदल्या दिवशी देशाची फाळणी होऊन त्याचा एक - तृतीयांशाएवढा मोठा भाग त्यापासून दूर झाला होता. देशाचे उत्पन्नाचे मोठे स्रोत तर त्यामुळे दुरावले होते. शिवाय देशाची फाळणी धर्माच्या नावावर झाल्यामुळे दूर झालेल्या पाकिस्तानातून हिंदू निर्वासितांचे लोंढे भारतात येत होते. त्यांची संख्याच एक कोटी दहा लाखांहून अधिक होती. त्याचवेळी भारतातून पाकिस्तानात जाणाऱ्या मुसलमान निर्वासितांचे लोंढेही तेवढेच मोठे होते. लोकसंख्येची इतिहासात कुठेही झालेली अदलाबदल कधीही शांततेत पूर्ण झाली नाही. खून, लुटालूट, मालांची पळवापळवी, स्त्रियांवरचे अत्याचार आणि प्रचंड रक्तपात असे सारे अनुभवतच जगातल्या फाळण्या तोवर झाल्या होत्या. भारताची फाळणीही त्याहून वेगळी नव्हती. जाणाऱ्यांना संरक्षण द्यायचे होते. येणाऱ्यांना आसरा द्यायचा होता. ज्यांनी सर्वस्व गमावले त्यांचे पुनर्वसन करायचे होते. शिवाय एक कोटी नव्या जनतेच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याचा प्रश्न होता. रक्त थांबविता येत नव्हते आणि अश्रूंना वाट द्यायलाही जागा नव्हती. अशा वेळी साऱ्यांच्या नजरा स्वाभाविकपणे देशाच्या नेतृत्त्वावर म्हणजे नेहरूंवर खिळल्या होत्या.

पाकिस्तानच्या निर्मितीमुळे देशाचा नुसता दुभंगच झाला नव्हता. त्यातले अनेक प्रदेश भारतापासून दूर होण्याची व स्वतंत्र राष्ट्र बनण्याची भाषा त्या काळात बोलत होते. पंजाबात मास्टर तारासिंगांच्या नेतृत्त्वात खलिस्तानच्या चळवळीने जोर धरला होता. दक्षिणेत द्रविडीस्तानची मागणी पेटत होती. पूर्व व पश्चिम बंगालचे स्वतंत्र राष्ट्र व्हावे अशी मागणी शहीद सुऱ्हावर्दी व सुभाषचंद्र बोसांचे बंधू शरदबाबू करीत होते. त्रावणकोर, भोपाळ, हैद्राबाद यांना वेगळे व्हायचे होते. मणिपूर व मिझोराम 'आम्हाला स्वतंत्र करा' अशी मागणी करीत होते. काश्मीरचे राजे त्यांचे संस्थान भारतात सामील करायला राजी नव्हते आणि हैदराबादचा निजाम त्यांचे संस्थान पाकिस्तानशी जोडण्याच्या तयारीत होता.

देश एकात्म नव्हता आणि प्रत्यक्ष काँग्रेस पक्षातही एकवाक्यता नव्हती. याच काळात चीनने तिबेटमध्ये आपले सैन्य उतरवून तो प्रदेश ताब्यात घेतला व आपली सीमा भारताच्या उत्तरेला आणून भिडविली होती. रशियाची राजवट चीनच्या बाजूने आणि अमेरिकेची महासत्ता भारताबाबत साशंक व दुष्टाव्याची भूमिका घेऊनच त्या काळात उभी होती.

नेहरूंना एवढ्या सगळ्या समस्यांना सामोरे जायचे होते. एकट्याने व एकाकी. १९४८ च्या जानेवारीत गांधीजींचा खून झाला आणि १५ डिसेंबर १९५० रोजी सरदारांच्या मृत्यू झाला. नेहरूंचे दोन्ही बळकट सहयोगी असे काळाच्या पडद्याआड झालेले आणि देशातील जनता त्यांच्याकडे आशेने पाहणारी. ''माझ्या समोर या घटकेला ४५ कोटी प्रश्न आहेत'' असे वक्तव्य त्यावेळी नेहरूंनी एका पत्रपरिषदेत केले होते.

एवढ्यावरच हे थांबणारे नव्हते. नेहरूंसोबत असणारी दोन माणसे त्यांना प्रेमाने 'भाई' म्हणत. एक जयप्रकाश नारायण आणि दुसरे होमी भाभा. जयप्रकाशांचे नेहरूंशी खासगीतील संबंध सलोख्याचे असले तरी समाजवादाच्या मुद्यावर ते टोकाची भूमिका घेणारे होते. स्वातंत्र्य मिळताच काँग्रेसमध्ये राहण्याची त्यांची व त्यांच्या काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची गरज संपली. शिवाय आता ज्यांचा काँग्रेसवर विश्वास नाही, त्यांनी पक्ष सोडावा ही सरदारांची मागणी होती. त्यानुसार दि. २४ मार्च १९४८ या दिवशी नाशिकला झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात जयप्रकाशांनी आपण काँग्रेसपासून दूर होत असल्याची घोषणा केली. त्याचवेळी काँग्रेसवर धर्मांध, लोकशाहीविरोधी व हुकूमशाही प्रवृत्तींवर वरचष्मा वाढला असल्याचा आरोपही त्यांच्या सोशॅलिस्ट पक्षाने आपल्या एक हजार शब्दांच्या ठरावात केला. नेहरू स्वत:ला समाजवादी म्हणायचे. पण समाजवाद्यांना त्यांचा कार्यक्रम ज्या घाईत अंमलात आणायचा होता ती घाई नेहरूंना मंजूर नव्हती. स्वातंत्र्याच्या लढ्याने दिलेली मूल्ये व भारताची परंपरागत मध्यममार्गी भूमिका यावर त्यांचा भर होता. झालेच तर समाजवाद्यांची राजकारणातली ताकदही ते ओळखून होते. आपला कार्यक्रम अंमलात आणायला हा शहरी लोकांचा उच्चभ्रू पक्ष असमर्थ असल्याचे ते चांगले जाणून होते. मात्र समाजवाद्यांच्या दूर जाण्याने आपण आपले विश्वासाचे समर्थक गमावल्याचे दु:ख त्यांच्या मनात होते. १ जुलै १९४८ रोजी पं. गोविंद वल्लभपंतांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'जयप्रकाश हा एक सरळ मनाचा व नेक दिलाचा माणूस आहे. तो चारित्र्यसंपन्न आहे. असा माणूस आपल्यापासून दूर जाणे चांगले नाही !' मात्र आपल्या बळाचा पुरेसा अंदाज नसणाऱ्या जयप्रकाशांनी पुढे १० डिसेंबर १९४८ रोजी नेहरूंनाच एक भाषण ऐकविले. ते म्हणाले, 'तुम्ही भांडवलदारांच्या मदतीने समाजवाद आणू पाहता. तुमचे अपयश निश्चित आहे!' नंतरच्या काळात तर नेहरू देशावर फॅसिझम लादत आहेत, असा आरोप करण्यापर्यंत त्या चांगल्या माणसाची मजल गेली. आणि वास्तव हे की, त्या काळात नेहरूंचा शब्द त्यांच्या पक्षातही अखेरचा ठरत नव्हता. त्यावर उजव्या विचाराच्या लोकांची पकड मोठी होती... फाळणीनंतरचा देशाचा काळ मनानेही 'इस्लामविरोधी' व काहीसा पटेलांच्या बाजूने झुकला होता.

त्यातच डावे (समाजवादी) काँग्रेसबाहेर पडल्याने उजव्या मताचे वजन त्या पक्षात वाढले होते. त्याचमुळे ६ जानेवारी १९४८ या दिवशी लखनौच्या सभेत बोलताना सरदार पटेलांनी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचे' सरळ आमंत्रणच दिले! ते म्हणाले ''मी मुसलमानांना आपला मित्र मानतो. मात्र त्यांनी त्यांच्या भारतावरील निष्ठेचे प्रमाण दिले पाहिजे. काँग्रेसमधील अनेक सत्ताधाऱ्यांना, ते संघाला संपवू शकतील असे वाटत असले तरी ते खरे नव्हे. कोणतीही संघटना सत्तेच्या बळावर संपविता येत नाही. वास्तविक हा काळ संघाने काँग्रेसमध्ये येऊन त्या पक्षातील राष्ट्रवादी विचारांना बळकट केले पाहिजे!' पटेलांच्या बोलण्याचा रोख अर्थातच नेहरूंवर होता. राजेंद्र प्रसादांसारख्या नेत्याच्या भूमिकाही त्याहून अधिक कडव्या व टोकाच्या होत्या. १७ सप्टेंबर १९४८ या दिवशी नेहरूंना लिहिलेल्या पत्रात ते म्हणाले, ''मुसलमानांना लष्कराचे संरक्षण देण्याचे तुमचे धोरण काँग्रेसची लोकप्रियता व मते कमी करणारे आहे, ते तुम्ही थांबविले पाहिजे.''

राजेंद्रबाबूंना लिहिलेल्या उत्तरात दि. १९ सप्टेंबरच्या पत्रात नेहरू म्हणतात, ''जोवर बापूंचा वचक होता तोवर आपण सारेच एकराष्ट्रीयत्वाची भाषा बोलत होतो. त्यात धर्म वा जातील स्थान नव्हते. आज जेव्हा धर्माच्या नावावर कत्तली होत आहेत आणि क्रौर्याच्या कथांनी साऱ्यांची मने उद्ध्वस्त केली आहेत, तेव्हा अशी भाषा वापरणे आपल्याला न शोभणारे आहे.'' ते पुढे म्हणतात, ''मला पंतप्रधानपदाची आवड नाही. जोपर्यंत आपण काही मर्यादा व मूल्ये जोपासत नाही तोवर मिळविलेल्या स्वातंत्र्यालाही फारसा अर्थ उरत नाही. तुम्ही सांगता तसे केल्याने आपण स्वप्नात पाहिलेला भारत कधी अस्तित्वातच येणार नाही!''

प्रत्यक्षात सरदार व राजेंद्र प्रसाद हेही धर्मराज्यवादी नव्हते. परंतु फाळणीच्या घटनांनी त्यांना मुस्लिमविरोधी बनविले होते. अनेक मुस्लिम अधिकारी फाळणीनंतरही भारतात राहिले असले तरी ते

भारताशी एकनिष्ठ राहणार नाहीत असे त्या दोघांनाही, (हिंदू महासभेच्या श्यामप्रसाद मुखर्जींप्रमाणेच) वाटत होते. भारतात राहिलेले मुसलमान ही पाकिस्तानात राहिलेल्या हिंदूंच्या सुरक्षिततेची हमी आहे, असेच त्या तिघांचे मत होते.

मात्र ३० जानेवारी १९४८ या दिवशी नथुराम गोडसेने गांधीजींचा खून केला तेव्हा त्याच्या हौतात्म्याच्या कडकडाटाने सारा देश हादरला. तो हादरा पटेल व प्रसादांनाही होता. एवढा की, त्यानंतरच्या दीड महिन्यात पटेलांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांना विश्रांतीसाठी डेहराडूनला हलवावे लागले. मात्र फाळणीतील दंगलींनी काँग्रेसचे अनेक नेते त्यांच्या मताकडे त्या काळात वळले होते हे वास्तव आहे. त्यात बिधनचंद्र रॉयांपसून दक्षिणेतील अनेक काँग्रेस नेत्यांचा समावेश होता. ''ज्या प्रमाणात भारतात हिंदू येतील त्या प्रमाणात पाकिस्तानात मुसलमान रवाना केले जातील.'' अशी सरळ धमकी नेहरूंनी पाकिस्तानला द्यावी अशी सूचना करण्यापर्यंत या नेत्यांची तेव्हा मजल गेली होती. नेहरू या दबावापुढे झुकले नाहीत आणि त्यांनी त्यांचे सर्वधर्मसमभावाचे धोरण आपल्या समजुतीप्रमाणे कठोरपणे राबविले.

नेहरूंना दुसरा संघर्ष करावा लागला तो राजेंद्रबाबूंशी यावेळी राजेंद्रबाबांनी देशात गोवधबंदी केली जावी व त्यासंबंधीची गांधीजींची इच्छा सरकारने तात्काळ पूर्ण करावी अशी मागणी मंत्रिमंडळात केली. त्याविषयीचे एक सविस्तर पत्रही त्यांनी पंतप्रधानांना लिहिले. ७ ऑगस्ट १९४८ रोजी राजेंद्रबाबूंना लिहिलेल्या उत्तरात नेहरू म्हणतात, ''गोवधबंदीचा विचार बापूंनी केला हे वास्तव आपल्याएवढेच मलाही चांगले ठावूक आहे. मात्र कोणताही निर्णय त्याच्या सर्व परिणामांचा विचार करून घेतला जावा असेही बापू म्हणत. आपण सरकारात आहोत, त्यामुळे अशा परिणामांविषयीची व्यापक चर्चा करूनच त्याविषयीचा निर्णय घेतला पाहिजे. गोवध बंदीची सध्या सुरू असलेली चळवळ रामकृष्ण दालमिया या उद्योगपतीने आपल्या पैशाच्या बळावर चालविली आहे, ती लोकचळवळ नाही. एकाच तऱ्हेची व एकत्र लिहून सरकारकडे पाठविलेली यासंबंधीची पत्रे नुसती पाहिली तरी या चळवळीचा बोलविता धनी आपल्या लक्षात येणार आहे. शिवाय दालमिया हे फारसे चांगले गृहस्थ नाहीत हे तुम्हीही जाणताच!'' (दालमिया या उद्योगपतीवर बहुपत्नीत्वाच्या आरोपावरून व धर्मांध चळवळींना पैसा पुरविण्यावरून १९४०च्या दशकात पोलिसांनी लक्ष ठेवले होते हे येथे उल्लेखनीय.)

सरदार पटेल आणि त्यांच्या सहकाऱ्यासोबतचे नेहरूंचे मतभेद कायमच होते. देशातील संस्थाने (काश्मीर, हैद्राबाद व जुनागढचा अपवाद वगळून) पटेलांच्या प्रयत्नांमुळे देशात विलीन झाली होती. मात्र या विलिनीकरणाच्या वेळी या संस्थानांच्या प्रमुखांना तनखे देण्याचे सरदारांनी सरकारच्या वतीने मान्य केले होते. ४.६६ कोटी रुपयांची ही रक्कम करमुक्त राखण्याचे अधिकारही या संस्थानिकांना त्यात होते. सरदारांना हा करार घटनेत समाविष्ट करून त्याला सरकार व जनतेच्या अभिवचनाचा दर्जा द्यायचा होता. नेहरूंना अशा तनख्यांची व त्यांना घटनेत समाविष्ट करण्याची बाब मुळातच अमान्य होती. बरेच दिवस चर्चा व खडाजंगी चालली. नेहरूंचे मंत्रिमंडळ ही त्यावर विभागले होते. अखेर नेहरूंनी आपला आग्रह मागे घेतला व पटेलांची भूमिका मान्य केली. घटनेत मालमत्तेच्या अधिकाराचा समावेश करावा या मतमागे सरदार, तर तो करू नये या भूमिकेचे नेहरू होते. देशातील जमीनदाराची संपवायची व कुळांना जमिनी देण्याची नेहरूंची तयारी होती. तर तसे करून ग्रामीण जनतेतील जमीनदारांचा रोष संघटितपणे उभा होण्याची भिती सरदारांना वाटत होती. याहीवेळी नेहरूंनी माघार घेतली व मालमत्तेचा अधिकार घटनेत समाविष्ट झाला. पुढे सरदारांच्या मृत्यूनंतर घटनेत दुरुस्ती करून 'सार्वजनिक हितासाठी एखाद्याची मालमत्ता काढून घेण्याचा व तिचा मोबदला ठरविण्याचा अधिकार सरकारला राहील' अशी घटनादुरुस्ती १९५१ मध्येच नेहरूंनी करून घेतली. सरकारने ठरविलेल्या मोबदल्याविरुद्ध कुणालाही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही अशी तरतूदही नव्या दुरुस्तीद्वारे (१९५५ मध्ये) केली गेली.

स्वातंत्र्यानंतर पटेल आणि नेहरुंमधील मतभेद उघड झाले होते. १९४७ च्या डिसेंबरला पटेलांनी उपपंतप्रधान, गृहमंत्रीपदाचा राजीनामा देण्याचीच तयारी केली होती. नेहरू आपल्या मंत्रालयाच्या कामकाजात हस्तक्षेप करतात, असा त्यावेळी त्यांचा आरोप होता. त्याला दोन कारणे झाली. जुनागडचे संस्थान विलीन करून घेताना, लष्कराने केलेल्या कारवाईत अन्याय झाल्याच्या तक्रारी आल्या तेव्हा नेहरूंनी त्याची चौकशी करण्यासाठी एका आयोगाची नियुक्ती केली. सरदारांना तो त्यांच्या कार्यक्षेत्रातील हस्तक्षेप वाटला. नंतर काश्मीरचा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेण्याचा निर्णय सरकारने घेतला तेव्हा तो प्रश्न संस्थानांचा न राहता आंतरराष्ट्रीय झाल्याने नेहरूंनी तो परराष्ट्र मंत्रालयाच्या अखत्यारित घेतला. सरदारांचा त्या निर्णयावरही राग होता. मात्र या मतभेदांच्या काळात त्या दोघांची समजूत काढायला गांधी होते. त्याही वेळी नेहरू व पटेल यांच्यातील सौदार्ह असे की, एक विदेशी पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीत नेहरू म्हणाले, ''मी नुसता नजरेचा इशारा केला तरी सरदार राजीनामा देतील आणि त्यांचा तसा इशारा मिळाल की मीही माझे पद सोडेन, हे आम्हा दोघांनाही चांगले ठावूक आहे आणि त्यावर पक्षाचाही विश्वास आहे!''

याच काळात देशाचे उद्योगमंत्रीपद सांभाळणाऱ्या श्यामप्रसाद मुखर्जी यांनी, देशाच्या औद्योगिक धोरणाचा एक आराखडा तयार करून तो मंत्रिमंडळाला सादर केला. तो आराखडा भांडवलदारांना व उद्योजकांना अभय देणारा आणि श्रमिकांचे अधिकार कमी करणारा होता. पटेलांनी तो अमान्य केला व तो तयार करण्याची जबाबदारी स्वत:कडे घेतली. त्यावेळी मुखर्जींना लिहिलेल्या ५ मार्च १९४८ च्या पत्रात सरदारांनी लिहिले. ''तुमचा आराखडा काँग्रेसच्या योजनांना तडे देणारा व जनतेत सरकारविषयी संशय उत्पन्न करणारा आहे. हे सरकार सामान्य माणसांच्या हिताची जपणूक करणारे आहे, याबद्दल आपण सदैव सावध असले पाहिजे.' मुखर्जींच्या राजीनाम्याची

सुरूवात या मतभेदात आहे, हे येथे लक्षात घ्यायचे.

नेहरू आणि पटेलांच्या मतभेदांचा एक विषय राजेंद्रबाबू हाही होता. लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या पश्चात गव्हर्नर जनरलची जागा घेणारे चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनीच देशाचे राष्ट्रपतीपद भूषवावे ही नेहरूंची इच्छा. तर या जागी राजेंद्रबाबूंनी यावे हा पटेलांचा विचार. या दोन्ही बाजू जनतेसमोर आल्या तेव्हा नेहरुंनीच त्या जागी यावे हा पटेलांचा त्यावरचा तोडगा. या साऱ्या बाजू जनतेसमोर आल्या तेव्हा नेहरूंनीच राजेंद्रबाबूंना पत्र लिहून, त्यांनी आपले नाव मागे घ्यावे व त्याऐवजी राजगोपालाचारींचे नाव सुचवावे अशी विनंती केली. पण त्यावर राजेंद्रबाबूंनी दिलेले उत्तर राजकीय होते. ते म्हणाले, ते म्हणाले याबाबत तुमचे व सरदारांचे एकमत होत असेल तर मी माझे नाव मागे घ्यायला तयार आहे...'' यातून जे समजायचे ते समजून नेहरूंनी राजगोपालाचारींच्या नावाचा आग्रह सोडला.

नंतरचा वाद काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदाबाबतचा. १९५० मध्ये पक्षाच्या अध्यक्षपदासाठी वर्किंग कमिटीने अकरा नेत्यांच्या नावांची यादी तयार करून ती नेहरूंच्या पसंतीसाठी त्यांच्याकडे पाठविली. त्यात पहिल्या क्रमांकावर नेहरूंचे व दुसऱ्या क्रमांकावर आचार्य कृपलानींचे नाव होते. यादीतील अखेरचे अकरावे नाव पुरुषोत्तमदास टंडन यांचे होते. नेहरूंनी अध्यक्षपद स्वीकारायला नकार दिला. पंतप्रधानपद सांभाळताना काँग्रेसचे अध्यक्षपदही मी स्वत:कडे घेणे हे लोकशाहीला धरून नाही, असे त्यांनी वर्किंग कमिटीला कळविले. मात्र त्याऐवजी त्यांनी कृपलानींच्या नावाची, (त्यांच्याशी मतभेद असतानाही) शिफारस केली. पटेल व राजेंद्रबाबूंच्या मनात टंडन यांचे नाव होते. त्याला बंगालच्या बिधनचंद्र रॉयांसह अनेकांची मान्यता त्यांनी मिळविली होती. टंडन हे उघडपणे हिंदुत्ववादी होते. 'फाळणीनंतर' मुसलमानांनी हिंदू संस्कृती स्वीकारावी. जमलेच तर त्यांनी तो धर्मही स्वीकारावा' अशी भाषणे ते उत्तर प्रदेशात सातत्याने करीत होते. उजव्या विचारांना व धर्मांध शक्तींना त्यांचा पाठिंबा होता व तोही ते जाहीरपणे सांगत होते. त्यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री पं. गोविंद वल्लभ पंत यांना पत्र लिहून 'टंडन यांना आवरण्याची' सूचना नेहरूंनी केली. हा विचार काँग्रेसच्या मूल्यांशी व विचारधारेशी जुळणारा नाही, तो देशात पुन्हा धार्मिक दुही माजविणारा आहे, असेही त्यात त्यांनी लिहिले... पुढे अध्यक्षपदाची निवडणूक झाली तेव्हा टंडन यांना १३०६, कृपलानींना १०९२ तर शंकरराव देवांना २०३ मते पडली. मात्र यावेळी नेहरूंनी नमते घेतले नाही. त्यांनी टंडन यांचे अभिनंदन करायला नकार दिला. शिवाय 'तुमची धोरणे पक्ष व देश यांना त्याच्या खऱ्या वाटेवरून दूर नेतील' असेही त्यांना ऐकविले. टंडन यांनी अध्यक्षीय कारकिर्द सुरू झाल्यानंतरही आपले जुनेच धोरण जाहीरपणे सांगायला सुरूवात केली, तेव्हा संतापलेल्या नेहरूंनी वर्किंग कमिटीच्या सदस्यत्वाचा राजीनामाच त्या कमिटीकडे पाठविला. पंतप्रधानांवाचून कार्यकारिणी, हा विषय त्या कमिटीचे वजन घालविणारा आणि तिला हास्यास्पद बनविणारा होता. परिणामी टंडन यांनीच राजीनामा दिला व त्या पदावर ९ सप्टेंबर १९५१ रोजी नेहरूंचीच निवड केली गेली.

नंतरचा वाद हिंदू कोड बिलाबाबतचा. त्या विधेयकाने स्त्रियांना दिलेले अधिकार कर्मठांच्या वर्गाला मान्य होणारे नव्हते. ते बिल संसदेत आणले जाऊ नये यासाठीच मग पक्षातील उजव्या विचाराच्या लोकांनी कंबर कसली. त्यासाठी ते प्रत्यक्ष राजेंद्रबाबूंपर्यंत पोहचले. त्यावेळी देशाचे राष्ट्रपतीपद भूषवीत असलेल्या राजेंद्रबाबूंनी मंत्रिमंडळाला बाजूला सारून, प्रत्यक्ष लोकसभेच्या सभापतींनाच, (अनंत शयनम् अय्यंगार यांना) ते विधेयक चर्चेला घेऊ नका अशी आज्ञा केली. हा घटनाबाह्य प्रकार होता. राष्ट्रापतीने मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार निर्णय घ्यायचे असतात आणि राजेंद्रबाबू मंत्रिमंडळालाच बाजूला सारत होते. यावेळी पुन्हा नेहरूंनी त्यांच्याशी लढत घेऊन पंतप्रधानपदाचा राजीनामा त्यांच्याकडे पोहोचता केला. नेहरूंची लोकप्रियता तेव्हा एवढी जबर होती की, त्यांच्या राजीनाम्याने राष्ट्रपतीच हादरले व सभापतींना पाठविलेले ते आदेशवजा पत्र मागे घेतले. राजेंद्रबाबूंचे काही आक्षेपही चमत्कारिक व प्रसंगी बालिश वाटावे असे असत. आपली घटना लागू करून भारताला गणराज्य बनविण्याची ठरलेली तारीख २६ जानेवारी ही होती. मात्र हा दिवस ज्योतिषांनी अशुभ असल्याचे राजेंद्रबाबूंना सांगितले. त्यामुळे ती तारीख बदलण्याचा हट्ट त्यांनी धरला. याहीवेळी 'या देशाचा राज्यकारभार आपण चालविणार आहोत की देशातले ज्योतिषी' असा प्रश्न विचारून नेहरूंनी त्यांना गप्प केले. वास्तव हे की २६ जानेवारी हा आपला स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्याचे धोरण काँग्रेसने १९३० मध्येच स्वीकारले होते व त्या निर्णयाचे एक भागीदार राजेंद्रबाबूही होते.

नंतर झालेल्या नाशिकच्या काँग्रेस अधिवेशनात स्वत: नेहरूंनीच एक ठराव मांडून त्यात ''काँग्रेस पक्ष गांधीजींच्या मार्गावरून कधी ढळणार नाही आणि त्यांची शिकवण तो विसरणार नाही'' असे म्हणतानाच ''काँग्रेस पक्ष सदैव जातीयता व धर्मांधता यांना विरोध करील व सर्वधर्मसमभावाचे सर्वसमावेशक धोरण पुढे चालवील'' हे स्पष्ट केले. प्रचंड बहुमताने (चार जणांच्या विरोधासह) तो ठराव मंजूर झाला. त्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावर डॉ. पट्टाभि सितारामय्या होते. मात्र काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा दरारा आता मावळला होता आणि नेहरूंच्या अधिकारापुढे व लोकप्रियतेपुढे कुणाचे फारसे काही चालेनासे झाले होते.

पक्षातला संघर्ष संपताच नेहरूंनी देशाच्या एकात्मतेपुढे उभी झालेली आव्हाने संपवायला सुरूवात केली. पंजाबात मास्टर तारासिंगांना अटक होऊन तेथील खलिस्तानची चळवळ संपविली गेली. शरदचंद्र बोस यांना आपल्या मंत्रीमंडळात घेऊन त्यांना स्वतंत्र बंगालची मागणी सोडायला लावले गेले. १९५२ च्या निवडणुकीत दक्षिणेतील सर्व राज्यांत प्रचंड बहुमत मिळवून द्रविडीस्तानच्या मागणीमागे जनमत नसल्याचेही नेहरूंनी सिद्ध केले.

**(जवाहरलाल नेहरू यांच्या वरील साधना साप्ताहिकांच्या दिवाळी अंकामधून)**

❐

# भारतीय परिवर्तनाचा प्रश्‍न व गांधी-आंबेडकर-मार्क्स समन्वय!

■ डॉ. भालचंद्र कानगो

गेल्या वर्षी बाबासाहेब आंबेडकरांची १२५वी जयंती! या वर्षी म. गांधींची १५०वी जयंती व कार्ल मार्क्सची २००वी जयंती. या पार्श्‍वभूमीवर डॉ. रावसाहेब कसबे, श्री. उत्तम कांबळे, पुरोगामी लेखक संघाचे श्रीपाद जोशी व डॉ. भालचंद्र कानगो यांच्या पुढाकाराने राज्यभर विविध ठिकाणी कार्ल मार्क्स- गांधी-आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने संमेलने भरविण्यात आली. नागपूर, सांगली, नाशिक या ठिकाणीही संमेलने चांगल्या रीतीने पार पडली.

परंतु या निमित्ताने अनेक प्रश्‍नांची चर्चा झाली व या तीन महापुरुषांचे विचार, कार्य व त्यांच्यातील साम्य व विरोध याचीही चर्चा सुरू झाली. कुठल्याही महापुरुषाचे विचार व कार्य यांची चर्चा करताना, तत्कालीन परिस्थिती व आव्हाने यांचा विचार करूनच ते करावे लागते व त्यांचा विचार आजच्या काळात करताना आजची परिस्थिती, संदर्भ व आव्हाने ध्यानात ठेवूनच चर्चा करणे योग्य ठरते.

मार्क्स हा १९व्या शतकातला तर गांधी व आंबेडकर हे २०व्या शतकातील. परंतु मार्क्सवादी चळवळी, आंबेडकरवादी चळवळी व गांधीवादी चळवळी यांचा भारतातील कार्यकाल मात्र प्रामुख्याने २०व्या शतकातील १९२५ ते १९५० चा कालखंड असे वर्णन केल्यास योग्य होईल! **या सर्व विचारांमधील सर्वात मोठे साम्य व वैशिष्ट्य म्हणजे हे सर्व विचार मनुष्यकेंद्रित आहेत. मानवी जीवन, मानवाचे कल्याण यांचा विचार हा या विचारांचा गाभा आहे.** गांधीवादी विचार हे भारतीय स्वातंत्र्यलढा व स्वतंत्र भारताचे भवितव्य व भारतीय परंपरा, श्रद्धा यांच्याशी जोडले गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे भारतीय स्वातंत्र्यात दलित जमातीचे स्थान काय? व नवीन भारताचे भवितव्य व वाटचाल याच्याशी जोडले गेले; तर मार्क्सवादी विचार हे स्वातंत्र्य, साम्राज्यवाद विरोध, याबरोबरच नवस्वतंत्र भारताचे भवितव्य कष्टकरी समूहाशी जोडणारे विचार व क्रांती यावर भर देणारे होते.

म्हणजे-स्वतंत्र भारत व त्याचे भवितव्य व स्वातंत्र्यात व भारतात जनतेचे स्थान याला महत्त्व देणारे हे विचार होते हा त्यांच्यातील समान दुवा!

प्रमुख प्रश्‍न या चळवळी करताना या तिन्ही विचारांनी आधार काय शोधले हा आहे व होता. गांधीवादी हे समन्वयवादी भूमिका घेत स्वातंत्र्यलढ्यात सर्व वर्ग-जात-समूहांना, धार्मिक समूहांना बरोबर घेणारे विचार व व्यवहारांत बरोबर घेत होते. डॉ. आंबेडकरांनी सांस्कृतिक क्रांती व आत्मभान यांची गरज लक्षात घेऊन पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजाला आधार बनवतात. श्रमिकांचा आधार शोधला; तर मार्क्सवाद्यांनी-कष्टकरी समूहांना बरोबर घेऊन वर्ग-विद्रोहाची भाषा करीत, परंपरा व वर्चस्ववाद यावर हल्ले चढविले!

त्यामुळे आंबेडकरवाद व मार्क्सवाद यामध्ये जास्त साम्यस्थळे आढळतील; परंतु स्पर्धाही दिसेल. कारण समान आधार व त्यासाठी स्पर्धा हा व्यवहार होत होता!

गांधीवाद हा प्रामुख्याने समन्वयवादी जरी असला तरी अंतिमत:

मानवी चेहरा ठेवून आहे. वर्ग-जातींना अन्यायाची जाण, जबाबदारीची जाणीव करून देणारा व त्यामुळे समाजातील अंतिम घटकाचा विचार व विकास याला महत्त्व देणारा होता व आहे.

त्यामुळे हे तिन्ही विचार-वर्चस्ववादी प्रभुत्ववादी व्यवहार-विचारांच्या-संकुचित अस्मितावादी विचारव्यवहारांच्या विरोधातच उभे आहेत व होते.

आज सर्व जगभर संकुचित वर्चस्ववादी, वंशवादी, धर्मांध, विज्ञानविरोधी, नफेखोर विचार व व्यवहार यांची दहशत, भीती असुरक्षिततेच्या नावाखाली वाटचाल होत असताना समानतेवर, मानवतेवर व मानव कृतीवर विश्वास ठेवून भीती व दहशतीपासून मानवी मुक्तीचा विचार व या तिन्ही महापुरुषांच्या मानवकेंद्रीत विचारांमध्ये दिसतो. त्यामुळेच या विचारांत संकुचित असमानता मानणारे वर्चस्ववादी, आर्थिक व सांस्कृतिक विचार व व्यवहार यांना स्थान नाही.

या पार्श्वभूमीवर आज आपल्या देशात आर.एस.एस. व भाजपा व तत्सम संघटनांमार्फत जो सांस्कृतिक वर्चस्ववादाचा खेळ चालू आहे. समानता-बहुविविधता व धर्मनिरपेक्ष लोकशाही व्यवहाराला महत्त्व न देणाऱ्या संविधानाविरोधी व्यवहार चालू आहे. शक्तीच्या नावाखाली अतिरेकी राष्ट्रवाद व दुराभिमान वाढविला जात आहे - त्याच्या विरोधात मानवकेंद्रित आधुनिक सहिष्णू भारताचे स्वप्न पाहणारे, जनतेसाठी राष्ट्र व स्वातंत्र्य असे मानणारे, गांधी-आंबेडकरवाद-मार्क्स यांचे विचार व कार्य यांच्या एकत्रीकरणाची भारतीय वास्तवात गरज आहे. भारतीय मानस हे धार्मिक आहे. परंतु हा भारतीय धर्म, वर्चस्ववादी संकुचित नाही तर संदिग्ध आहे हे म. गांधी यांनी या धर्म भावनेने प्रभावीत असलेल्या जनतेला बरोबर घेऊन दाखविले व त्याचबरोबर अस्पृश्यता हा कलंक आहे व तो दूर झालाच पाहिजे हा आग्रह धरून समानत्व तयार केले. तर दुसरीकडे डॉ. आंबेडकरांनी वर्षानुवर्षे अन्याय, दारिद्र्य यांनी पछाडलेल्या समूहांत आत्मभान व अस्मिता निर्माण करून, परिवर्तनाचा, समतेचा आवाज बुलंद करून स्वातंत्र्याला अर्थ दिला आणि मार्क्सवाद्यांनी आधुनिक विचार यांनी श्रमिकांच्या चळवळीशी व वर्गसंघर्षाशी जोडून अन्यायाची आर्थिक बाजूही स्वातंत्र्यासाठी आवश्यक असल्याचे भान आणले व या तिन्हींचा समन्वय भारतीय घटनेमध्ये पाहावयास मिळतो व त्यामुळेच **आज संविधान बचाओ! देश बचाओ हा नारा दिला जात आहे.**

पंडित नेहरू या भारताच्या पंतप्रधानांना भारतीय घटना व त्याची तत्त्वे व आधुनिक भारताची जडणघडण यांची जोड घालण्याची संधी मिळाली व त्यांनी जाणिवपूर्वक या तिन्ही तत्त्वज्ञानाचा, चळवळीचा योग्य बोध घेऊन वाटचाल केली. म. गांधींचे समन्वयाचे धोरण त्यांनी त्यांचा वारस म्हणून निश्चितपणे राबविले; परंतु त्याचबरोबर समानता व आधुनिकता आणि भारतीय  परंपरा यांचा मिलाफ बहुविविधतेत एकता (युनिटी इन, डायव्हरसिटी) हे तत्त्व मांडून चांगल्या तऱ्हेने केले. लोकशाही समाजवाद व धर्मनिरपेक्षता यांची सांगड घातली याची नोंद इतिहासाला घ्यावीच लागेल. **नेहरूच्या या वैशिष्ट्यामुळेच आता संघ-भाजपा त्यांना मुख्य शत्रू मानतो व ते विस्मरणात जावे म्हणून प्रयत्न करतो.**

मार्क्सवादी चळवळ, आंबेडकरवादी चळवळ व गांधीवादी चळवळ एकाच कालखंडात वाढल्या व त्यामुळे त्यांच्यात तीव्र स्पर्धा ही होताच अनेक वेळा तत्कालीन परिस्थितीत त्या एकमेकांविरुद्ध उभ्या राहिल्याचे चित्र दिसते. प्रतिगामी-वर्चस्ववादी संकुचित सांस्कृतिक राष्ट्रवाद मानणाऱ्या आजच्या शक्तींनी स्वातंत्र्य लढ्याकडे पाठ फिरवल्याने, जगात त्यावेळेस लोकशाही समाजवाद व लोककल्याणकारी राजवटीचा जोर वाढल्याने, या मार्क्सवादी, गांधीवादी व आंबेडकरवादी चळवळींना आपसांत स्पर्धा व टीका करण्याची संधी मिळाली. असे वर्णन अतिशयोक्तपूर्ण होणार नाही. **परंतु आज परिस्थिती बदलत असताना या तिन्ही विचार व चळवळी यांच्यातील समानता व मानवकेंद्रित विचार यांचे महत्त्व ध्यानात ठेवून व्यवहार करावा लागेल, याचे भान ठेवलेच पाहिजे.**

❐

**''धर्म निरपेक्ष राज्य हे आपल्या संविधानाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. भारतातील लोकांचे ऐक्य त्यावर अवलंबून आहे. अन्यथा विकासाच्या आशा-आकांक्षा व्यर्थ ठरतील.''**

**- बेगम एजाज रसूल**

# संविधानाचे रक्षण कोण व कसे करणार?

■ सुभाष वारे

***संविधानसभेने मंजूर केलेले मूलभूत अधिकार भारतीय नागरिकांना नक्की मिळतील का? अशी शंका उपस्थित करून बाबासाहेब पुढे म्हणतात, केवळ संसद केवळ न्यायालय किंवा केवळ एखादा कायदा नागरिकांना मूलभूत अधिकारांची खात्री देऊ शकत नाही तर समाजाचा सामूहिक सदसद्विवेकच नागरिकांना मूलभूत अधिकारांची खात्री देऊ शकेल. बाबासाहेबांनी हे फार महत्त्वाचं भाष्य केलेलं दिसतंय. केवळ संविधानात आहे म्हणून किंवा एखादा कडक कायदा बनविला म्हणून आपले प्रश्न आपोआप मार्गी लागणार नाहीत. त्या त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जनमत आग्रही बनले पाहिजे. संविधानातील तरतुदींच्या बाजूने शांततेच्या सनदशीर मार्गाने जनमताचा दबाव सरकारवर निर्माण केला पाहिजे. समाजाचा सामूहिक सदसद्विवेक संवैधानिक मूल्यांच्या बाजूने उभा राहिला पाहिजे. हा सदसद्विवेक केवळ अधिकारांसाठी नव्हे तर संवैधानिक कर्तव्यांच्या पालनासाठी पण उभा राहिला पाहिजे.***

नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील एन.डी.ए.चे सरकार सत्तेत आल्यापासून देशभरातील संविधानप्रेमी अस्वस्थ आहेत. हे सरकार संविधान बदलणार का? अशा शंका सातत्याने व्यक्त होताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर २०१५ साली समविचारी संघटनांच्या सहकार्याने एस.एम. जोशी सोशॅलिस्ट फाऊंडेशनने संविधान साक्षरता अभियान सुरू केले आणि त्याला महाविद्यालयीन युवती-युवक, शेतकरी, महिला बचत गटाच्या सदस्य महिला तसेच कामगार संघटनांचे सदस्य कामगार यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. अनेकांची संविधान समजून घेण्याची उत्सुकता त्या वेळी वाढलेली जाणवली. अलीकडील काळात आणखी काही संघटना आणि काही राजकीय पक्षांनीही संविधानाच्या मुद्द्याकडे लक्ष दिलेले दिसत आहे. ठिकठिकाणी संविधान सन्मान मोर्चे किंवा संविधान बचाव परिषदा आयोजित होत आहेत. या सरकारच्या काळातच लोकांच्या मनात अशा शंका का येत असतील? आधीचे यू.पी.ए.चे सरकारही संवैधानिक मूल्यांना पुढे घेऊन जाण्यासाठी फार भरीव प्रयत्न करत होते असे नाही. उलट मोदींनी तर सत्तेत आल्याबरोबर केवळ संविधानावर चर्चा करण्यासाठी संसदेचे दोन दिवसांचे अधिवेशन घेतले होते. त्या अधिवेशनात स्वत: नरेंद्र मोदींनी संविधानातील महत्त्वाच्या तरतुदींच्या तपशिलात न जाता शब्दांचे फुलोरे सजवत संविधानाचा गौरव करणारे भाषण केले होते. तरीही लोकांच्या मनात शंका आहेत. त्याला कारण एन.डी.ए. सरकारचा कारभार आहे. हे सरकार सत्तेत आल्यानंतर गोरक्षकांनी झुंडशाही करून अनेकांना मारले. सरकार समर्थक संघटना त्याबद्दल अभिमान बाळगताना दिसतात आणि सरकार याबाबत गंभीर नाही. उलट सरकारचे अर्थ राज्यमंत्री जयंत सिन्हा हे अशा प्रकरणातील आरोपींचा सत्कार करण्यात धन्यता मानतात. म. गांधींच्या खुन्याची स्तुती करत त्याचे मंदिर उभारण्याची भाषा करण्यापर्यंत या सरकारच्या समर्थकांपैकी काहींची मजल गेली. तरीही सरकार शांत आहे. शासकीय जाहिरातींच्या निमित्ताने समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे शब्द वगळलेली राज्यघटनेची प्रास्ताविका वर्तमानपत्रात छापून आणली गेली. त्याबद्दल अधिकृतपणे खेदही व्यक्त केला गेला नाही. सरकारच्या ध्येय-धोरणाच्या आणि

कार्यक्रमांच्या विरोधात बोलणाऱ्यांचा आवाज दाबून टाकत त्यांना पाकिस्तानात जाण्याचे सल्ले सत्तापक्षाशी संबंधित लोक सतत देत असतात. राज्यपालपदाच्या दुरुपयोगाची काँग्रेसची परंपरा भाजपने पुढे चालू ठेवली आहे. न्यायालयाने याबाबत सरकारला सुनावले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सरकारच्या आर्थिक धोरणांच्या परिणामी आर्थिक विषमता भयावह वाढते आहे. बेरोजगारी वाढते आहे. राज्यघटनेतील ३८व्या कलमाने आर्थिक विषमता कमी करण्याचे आणि ४१व्या कलमाने सर्वांना शिक्षण आणि रोजगार देण्याची जबाबदारी राज्यावर टाकलेली असताना सरकारची धोरणे मात्र त्याच्या उलट आहेत. घटनात्मक आरक्षणाबद्दल सत्तापक्षाचे आणि त्यांच्याशी संबंधित संघटनांचे नेते उलट-सुलट विधाने पेरून गैरसमज पसरवीत आहेत आणि कार्यकर्ते समाज माध्यमात आरक्षण संपविण्याची भाषा करत आहेत. भारतीय समाजासमोरील अनेक प्रश्नांनी / समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केलेले आहे हे वास्तव आहे. संविधानातील महत्त्वाच्या तरतुदींची प्रामाणिक आणि ठोस अंमलबजावणी करण्याचा प्रयत्नच झालेला नाही ही वस्तुस्थिती नजरेआड करून, मग एवढ्या वर्षात संविधानामुळे काय साध्य झाले? असा प्रश्न शहाजोगपणे विचारून आजच्या अनेक गुंतागुंतीच्या समस्यांचे खापर संविधानावर फोडण्याचा प्रयत्न संविधान विरोधक करत आहेत. संविधान समर्थकांच्या मनात याबद्दलची अस्वस्थता वाढत असताना भाजपचे प्रेरणास्थान असणाऱ्या आर.एस.एस.चे प्रमुख श्री. मोहन भागवत यांनी एके ठिकाणी म्हटले की भारताच्या संविधानात भारतीय असे काहीच नाही. (There is no Indian essence in Indian Constitution). (अलीकडे १८ सप्टेंबर २०१८ ला दिल्लीतील आपल्या भाषणात मात्र मोहन भागवत यांनी वेगळा सूर लावत संविधान लिहिताना बाबासाहेबांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये युरोपीय तत्त्वज्ञानातून न घेता बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून घेतली आहेत असे म्हटले आहे. त्यांच्या या विधानाचे स्वागत आहे मात्र हे निवडणुकांच्या तोंडावर बोलण्याची रणनीती असू नये ही अपेक्षा. ही शंका घेण्याचे कारण म्हणजे घटनात्मक आरक्षणाबद्दल अशीच वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी विधाने भागवत यांनी केली आहेत. दरम्यान कर्नाटकातील भाजप मंत्री श्री. हेगडे म्हणतात की, आम्ही संविधान बदलण्यासाठी आलो आहोत. (We are here to change the Constitution). अशा सर्व घटनाक्रमामुळे या सरकारच्या काळात संविधान सुरक्षित नाही. हे लोक संविधान बदलायला निघाले आहेत, असा नागरिकांचा समज मोठ्या प्रमाणावर होत आहे.

या सरकारला संविधान बदलणे शक्य आहे का? सरकार खरेच संविधान बदलेल का? असे झाले तर सर्वोच्च न्यायालयाची काय भूमिका असेल? हे समजून घेण्यापूर्वी संविधान दुरुस्ती आणि संविधान बदल यातील फरक समजून घेतला पाहिजे. संविधानात ३६८ वे कलम हे संविधान दुरुस्तीचे कलम आहे. या कलमाने सांगितलेली कायदेशीर प्रक्रिया पार पाडून संविधानात आजवर अनेक वेळा दुरुस्ती झालेली आहे. संसदेने आणि राज्यांच्या विधानसभांनी दोन तृतीयांश बहुमताने या दुरुस्त्या केल्या आहेत. संविधान दुरुस्तीबाबत संसदेला अधिकार आहे की नाही याबाबत सर्वोच्च न्यायालय आणि संसद यांच्यामध्ये प्रदीर्घ वादविवाद झालेला आहे. या वादविवादाच्या शेवटी सर्वोच्च न्यायालयाचा एक अंतिम निकाल आलेला आहे. तो सर्वांनी मान्य केलेला आहे. तो निकाल असे सांगतो की संसदेला संविधान दुरुस्तीचा अधिकार आहे मात्र संविधान दुरुस्तीद्वारे संविधानाच्या गाभ्यामध्ये संसदेला बदल करता येणार नाही. संविधानाचा गाभा म्हणजे काय हेही सर्वोच्च न्यायालयाने नंतरच्या काही निकालात स्पष्ट केले आहे. संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत अधिकार हा सर्व संविधानाच्या गाभ्याचाच भाग आहे. याच्यात नकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न केल्यास सर्वोच्च न्यायालय दखल घेऊ शकेल आणि अशी घटना दुरुस्ती निरस्त करू शकेल. उलटपक्षी संविधानाने उद्याच्या भारताचे जे स्वप्न आपल्याला दाखविले आहे ते स्वप्न अधिक समृद्ध होऊ शकेल अशा दुरुस्त्या संविधानात होऊ शकतात. शिक्षण आणि रोजगाराचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून देऊया अशी बाबासाहेबांची इच्छा होती. मात्र संसाधनांची अडचण सांगून संविधानसभेतील बाकी सदस्यांनी विरोध केला. संविधान लागू झाल्यानंतरच्या भारतात शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या घामामुळे सरकारची ऐपत वाढली आहे. संविधानानंतरचे पहिले अंदाजपत्रक फक्त ३४७ कोटी रुपयांचे होते. २०१८ सालचे अंदाजपत्रक २४ लाख कोटी रुपयांचे आहे. **आता संसाधनांची अडचण न सांगता शिक्षण आणि रोजगाराचा अधिकार हा मुलभूत अधिकार म्हणून देणारी घटना दुरुस्ती संविधान समर्थकांनी मागितली पाहिजे. संविधानाच्या स्वप्नाला आणखी बळकटी देणारी अशी घटना दुरुस्ती निश्चितच होऊ शकते मात्र संविधानाच्या गाभ्याला बदलवण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही, अशी सर्वोच्च न्यायालयाची भूमिका दिसते. आपलीही तीच भूमिका असली पाहिजे.**

अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतानाच एन.डी.ए. सरकारने राज्यघटना पुनर्विलोकन समिती नेमली होती. त्याला संविधानप्रेमी संघटना आणि व्यक्तींनी कडक विरोध केला होता. त्या समितीनेही राज्यघटनेमध्ये मूलभूत बदल करण्याबाबत अडचण दर्शवणारा अहवाल दिला होता. या अनुभवातून आताच्या एन.डी.ए. सरकारने दुहेरी रणनीती अवलंबलेली दिसते. एका बाजूला संविधान आणि संविधानातील

महत्त्वाच्या तरतुदी यांच्याबद्दल गैरसमज किंवा नकारात्मक समज निर्माण होतील, अशी विधाने जबाबदार व्यक्तींनी सतत करत राहायचे. त्यातून लोकांच्या मनातील संविधानाबाबतचा आदर आणि विश्वास कमी करण्याचा सतत प्रयत्न करायचा. यामुळे हळूहळू संविधानाची अधिमान्यता कमी होईल. तसेच हे संविधान अपयशी ठरले आहे असा गैरसमज वाढवत न्यायचा आणि दीर्घकालीन रणनीती आखत संविधान बदलासाठी अनुकूल जनमानस बनविण्याचे प्रयत्न चिकाटीने करत राहायचे ही आखणी दिसत आहे. दरम्यानच्या काळात दैनंदिन कारभारात संविधान बाजूला ठेवून किंवा प्रसंगी संविधान धाब्यावर बसवून कारभार पुढे रेटायचा. वर लिहिल्याप्रमाणे जाहीर कार्यक्रमात किंवा संसदेच्या विशेष अधिवेशनात संविधानाचा गौरव करायचा आणि कारभार मात्र संविधानाच्या विरोधी करायचा असे तंत्र दिसते आहे.

**यांना संविधानाची काय अडचण आहे?**

संविधान अस्तित्वात येण्याआधीच्या समाजात मूठभर लोकांना विशेष अधिकार होते. मतदानाचा अधिकार सर्वांना नव्हता. मालमत्ता धारण करण्याचा किंवा शिक्षण घेण्याचा अधिकार हा मर्यादित लोकांनाच होता. जन्माच्या आधारे आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची दाद मागण्याचा अधिकार खालच्या जातीतील मानल्या गेलेल्या समूहांना नव्हता. आपण केलेल्या श्रमाचा मोबदला मागण्याचा अधिकार कष्टकऱ्यांना नव्हता. सरकारने आमच्या प्राथमिक आणि मूलभूत गरजा पूर्ण केल्या पाहिजेत, अशी मागणी करण्याचा अधिकार नागरिकांना नव्हता. भारतात संविधान लागू झाल्यावर मात्र परिस्थिती बदलली. **संविधानाने मूठभरांचे विशेष अधिकार काढून घेऊन सर्वांना समान अधिकार दिले. भारताचे संविधान म्हणजे, ''सर्व जाती-धर्मांच्या स्त्री-पुरुषांना सन्मानाची हमी आणि विकासाची संधी देणारे संविधान आहे''.** वास्तविक संविधान विरोधकांनासुद्धा सन्मानाने जगण्याचा अधिकार संविधानानेच दिला आहे. मात्र जन्माच्या आधारे कोणी उच्च किंवा कोणी नीच नाहीत. आपण सर्व जण समान आहोत ही भूमिका संविधानाने घेतली आहे. अडचण इथेच आहे. संविधानपूर्व समाजव्यवस्थेत केवळ जन्माच्या आधारे विशेष संधी, सन्मान आणि अधिकार भोगलेल्यांना आता सर्वांपैकी एक बनून जगणे मान्य नाहीये. म्हणून यांना संविधानाची अडचण असावी.

**नागरिकांनी कोणाच्या भरवशावर राहावे?**

संविधानाची प्रामाणिक अंमलबजावणी होईल यासाठी आपण संसदेच्या भरवशावर राहावे की न्यायालयाच्या? प्रामाणिक, सामाजिक प्रश्नांची समज आणि संवेदनशीलता बाळगणारे आणि असे प्रश्न सोडविण्याची दृष्टी असणारे लोकप्रतिनिधी संसदेत निवडून जातील यासाठी आपण प्रयत्न केलेच पाहिजेत. तसेच अन्याय झाला तर न्यायालयाकडे दाद मागितली पाहिजे. मात्र अनुभव असे सांगतात की एवढ्याने आपण निर्धास्त राहू शकत नाहीत. पैसा, बाहुबल, जात-धर्माचे आवाहन आणि गोबेल्सनीतीचा प्रचार यांचा वापर करून निवडणुकांचे निकाल हायजॅक केले जात आहेत. जागतिकीकरणानंतरच्या परिस्थितीत जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या वातावरणाचा किंवा बहुसंख्याकांच्या उन्मादाचा परिणाम न्यायालयीन निवाड्यावर अधूनमधून पडताना दिसत आहे. अशा वेळी मूलभूत अधिकारांवरील चर्चेच्या समारोप प्रसंगी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर काय म्हणाले होते त्याची आठवण येते. **महिला अत्याचार, दलित अत्याचार, झुंडीने घेतलेले अल्पसंख्याकांचे बळी या सर्व प्रसंगी कायदे, संविधान हे अत्याचारग्रस्तांच्या बाजूनेच असतात पण अत्याचार करणारे, झुंडीने येणारे, अत्याचार पाहूनही गप्प बसणे पसंत करणारे या सर्वांचा सामूहिक सदसद्विवेक मात्र त्या अत्याचारग्रस्तांच्या सोबत नसतो. म्हणून संवैधानिक मूल्य समाजात रुजले पाहिजेत. हक्कांसाठी कायदेशीर मार्गाने रस्त्यावर उतरण्याची तयारी असणारा समाज आणि इतरांच्या संवैधानिक हक्कांच्या प्रती जागरुकता आणि संवेदनशीलता बाळगणारा समाज हाच संविधानाचे रक्षण करू शकतो, संविधानाने संवर्धन करू शकतो.** जनआंदोलनाच्या राष्ट्रीय समन्वयाने आयोजिलेली 'संविधान सन्मान यात्रा' ही असा समाज निर्माण करण्यासाठी उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. संविधान सन्मान यात्रेला खूप खूप शुभेच्छा!

aabaware@gmail.com

❐

---

सामाजिक जीवन धर्मनिरपेक्ष नसेल तर शासनही खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष होऊ शकत नाही. अशा स्थितीत त्याची भूमिका बहुधा दिखाऊ, डळमळीत व व्यवहारवादी राहते. शासनाला धर्म नाही असे म्हणत म्हणत शासकीय पातळीवर अनेक धार्मिक विधी वाजतगाजत साजरे केले जातात. शासनाच्या नियंत्रणाखालील शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या मनावर परंपरागत धार्मिकतेचे संस्कार होत असतात. आकाशवाणी दूरदर्शन यांसारख्या प्रसारमाध्यमांच्या द्वारे सर्व धर्मांशी संबंधित असे कार्यक्रम सर्रास सादर केले जातात. कदाचित सर्वधर्मसमभाव म्हणजेच धर्मनिरपेक्षता असा संभ्रम यांच्या मुळाशी असेल.

**- गं. बा. सरदार**

# सिनेमा

## ‘इस्लामफोबिया’चा पर्दाफाश करणारा ‘मुल्क’

■ **लक्ष्मीकांत देशमुख, पुणे**

**(साधना-८ सप्टेंबर २०१८)**

शांततावादी व देशप्रेमी मुस्लीमांचा प्रतिनिधी मुरादअली मोहंमद ही भूमिका ऋषी कपूरनं साकारली आहे. त्याचा ‘अमर, अकबर, ॲन्थनी’ चित्रपटातला प्रेमळ, दिलखुलास तरुण अकबर इलाहाबादी प्रेक्षकांच्या आजही स्मरणात आहे. त्याचा अकबर ते मुरादअली हा प्रवास केवळ प्रगल्भ होत जाणाऱ्या व्यक्तिरेखांचा नाही तर तो भारतीय समाजाच्या मुस्लिमांप्रति बदलत जाणाऱ्या दृष्टिकोनाचा आहे. तो देशासाठी इष्ट नाही, म्हणून **‘हम और वो’** मधील फरक मिटला गेला पाहिजे. जुना इतिहास उगाळत बसलो तर आजचे कळीचे प्रश्न आपण कसे सोडवणार? हा न्यायाधीशाचा सवाल प्रातिनिधिक अर्थाने देशाच्या भवितव्याची चिंता असणाऱ्या सर्व सुजाण नागरिकांचा आहे.

‘‘पब्लिक प्रॉसिक्युटर कहते है, वो मुसलमानोंका सम्मान करते है, वो उनका यहां स्वागत भी करते है। पर मेरे घरमे मेरा स्वागत करने का हक उनको किसने दिया? ये मेरा घर है, जितना की उनका है और अगर उंगली उठाकर पुछोगे तो कहता हूँ - मेरी जिम्मेदारी सिर्फ मेरी इमानसे है, मेरे मुल्क से हैं।’’

‘मुल्क’ या हिंदी सिनेमातील कोर्टरूम दृश्यात मुरादअली मोहंमदची भूमिका करणारा ऋषी कपूर ज्या सात्त्विक संतापानं व तीव्र विषादानं, तुम्हाला (पक्षी : हिंदू समाज) आमचं (पक्षी : मुस्लिम समाजाचं) आमच्या घरी (पक्षी : या भारत देशात) स्वागत करण्याचा अधिकार कोणी दिला असं विचारतो, ते पाहताना व ऐकताना माझ्या अंगावर सर्रकन काटा आला.

हा सवाल आजच्या विषारी धार्मिक दुराव्याच्या काळात आम मुस्लिमांचा प्रातिनिधिक सवाल आहे. खरं तर १९४७ मध्ये फाळणीच्या वेळी देशातील करोडो मुसलमानांनी **‘मजहब’ (धर्म) ऐवजी ‘मुल्क’ (देश) निवडला,** तेव्हाच ते भारतीय असल्याचं सिद्ध झालं होतं. आणि आज सत्तर वर्षांनंतरही मूठभर कट्टर मुस्लिम माणसे वगळता आम मुसलमान समाज अमनपसंत व देशाप्रति इमान राखून आहे.

१५ ऑगस्टला राष्ट्रपतींनी वीर सैनिक औरंगजेबाला जे शौर्यचक्र दिलं, ते तो मुस्लिम आतंकवाद्यांशी लढताना शहीद झाला म्हणून दिलं होतं. काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुक अब्दुल्ला यांनी दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना श्रद्धांजली वाहताना दोन्ही हात फैलावत **‘भारत माता की जय’** व **‘जय हिंद’** म्हटलं होतं. मात्र आज प्रत्येक आतंकवादी घटना घडली की, मुस्लिमांकडे शंकेने पाहिलं जातं. मणिशंकर अय्यर ते नवज्योत सिद्धूपर्यंत अनेकांना (जेव्हा त्यांनी पाकिस्तानशी संवाद करावा असं म्हटलं) ‘गो बॅक टू पाकिस्तान’ असं म्हटलं आहे. ‘आम्हाला राष्ट्रीय मुसलमान प्रिय आहेत. उदाहरणार्थ - ए. पी. जे. अब्दुल कलाम’ असं आपण वारंवार ऐकतो, पण आम्हाला ‘राष्ट्रीय हिंदू’ हवे आहेत, असे कधी ऐकायला मिळत नाही. कारण आज हिंदू समाजातील एका मोठ्या वर्गाची मानसिकता ‘इस्लामफोबियां’ची झाली आहे. त्यामुळे मुस्लिमांपुढचा आजचा सर्वांत मोठा प्रश्न हा आहे की, त्यांनी कसं सिद्ध करायचं की, ते देशप्रेमी आहेत? हा आमचा ‘मुल्क’ आहे, ‘माय नेम इज खान, बट आय ॲम नॉट टेररिस्ट’

हे त्यांनी कसं पटवून द्यायचं.

या महत्त्वाच्या प्रश्नाला निर्भीड वाचा फोडणारा व हिंदू समाजातल्या एका वर्गाचा 'इस्लामफोबिया' कसा पूर्वग्रहदूषित व जाणीवपूर्वक घडविण्यात आला आहे, यावर थेट भाष्य करणारा 'मुल्क' हा ताजा सिनेमा एक दुर्मीळ योग आहे. या पूर्वी १९५९ व १९६१ मध्ये यश चोप्रांचे '**धूल का फूल**' व '**धरमपुत्र**' तर १९७३ मध्ये एस. एस. सत्यूचा '**गर्म हवा**' आला होता. नंतर सईद मिर्झाचा अपवाद वगळता अन्य चित्रपटांत मुस्लिम एक तर चांगला, पापभीरू 'रहिमचाचा' (शोले) असतो किंवा मैत्रीसाठी जीव देणारा 'शेरखान' (जंजीर) असतो... त्यांचा जगण्याचा संघर्ष, आयडेंटिटी क्रायसिंस, इस्लामशी जोडल्या गेलेल्या जागतिक दहशतवादामुळे त्यांच्याकडे संशयानं पाहणं, शिक्षण व रोजगाराची वानवा, गोरक्षणाच्या नावाखाली होणारं 'मॉब लिंचिग' या वास्तवाकडे हिंदी सिनेमे मुळीच वळत नाहीत.

मात्र २०१८ मध्ये अनुभव सिन्हानं 'मुल्क'द्वारे, एका आतंकी तरुणामुळे त्याचं पूर्ण कुटुंब कसं सफर होतं, याचं अत्यंत प्रभावी चित्रण धीटपणे करून राष्ट्रवाद, दहशतवाद व इस्लामफोबियावर नेमकं बोट ठेवत काही प्रश्न विचारले आहेत. ज्या प्रेक्षकांना आजच्या देशस्थितीचं थोडंबहुत ज्ञान आहे, ते 'मुल्क' पाहताना अस्वस्थ होतात. त्यांना नक्कीच प्रश्न पडू शकतो, आपण मुस्लिमांकडे भारतीय म्हणून का पाहत नाही? आमच्या मनात व विचारात त्यांच्याविषयी कोण जहर भरतंय, ज्यामुळे आम्हाला 'इस्लामफोबिया' झाला आहे?

'मुल्क' हा चाकोरीतले स्वप्नं दाखवत हलकंफुलकं मनोरंजन करणारा सिनेमा नाही, तो प्रेक्षकांना अस्वस्थ करतो आणि काही भेदक प्रश्न विचारतो. त्यासाठी दिग्दर्शकानं पूर्वार्धात कुटुंबनाट्याचा तर उत्तरार्धात काहीशा मेलोड्रॅमॅटिक पद्धतीच्या कोर्टरूम नाट्याचे डिव्हाईस वापरले आहे. सामान्य भारतीय मुस्लिमांचं जीवन रेखाटत हा सिनेमा, बहकलेल्या व दहशतवादाकडे झुकलेल्या मूठभर मुस्लिम तरुणांच्या आततायीपणामुळे आणि बहुसंख्य हिंदू समाजाला 'इस्लामफोबिया' झाला असल्यामुळे मुस्लिम समाज कात्रीत कसा सापडला आहे, याचं प्रभावी दर्शन घडवतो आहे. त्याबाबत अधिक भाष्य करण्यापूर्वी आपण 'मुल्क'चं कथानक पाहू या.

मुरादअली मोहंमद हा बनारसचा एक प्रतिष्ठित सेवानिवृत्त वकील व मोहल्ल्यातल्या लोकांना युनानी औषधं देणारा सद्‌गृहस्थ आहे. त्याचं हिंदू वस्तीत नव्वद वर्षांपासून घर आहे. त्याची पत्नी, धाकटा भाऊ बिलाल व त्याचं कुटुंब (ज्यात धर्मांध बनत आतंकवादी झालेला शाहिद आहे). त्याचा मुलगा लंडनला व्यवसाय करीत आहे व त्यानं एका हिंदू मुलीशी - आरतीशी प्रेमविवाह केला आहे. मुरादअलीच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त ती बनारसला घरी आली आहे. मुरादचा वाढदिवस धूमधडाक्यात नाच-गाणं व खाण्यानं साजरा होतो, मोहल्ल्यातील सारे हिंदू व मुस्लिम शेजारी त्यात सामील होतात. पण दुसऱ्या दिवशी कानपूरला एका बसमध्ये बॉम्बस्फोट होतो, सोळा प्रवासी मारले जातात. त्याचा संशय शाहिदवर येतो आणि तो दानिश या मुस्लिम पोलीस अधिकाऱ्यामार्फत मारला जातो आणि मग बिलालला दहशतवादी गुन्ह्यात सामील ठरवून अटक केली जाते. पुढे मुराद व पूर्ण मोहंमद कुटुंबाला आतंकवादी म्हणून समाज पाहू लागतो. संतोष आनंद हा सरकारी वकील साक्ष घेताना हिंदूंच्या मनातला 'इस्लामफोबिया'प्रगट करतो व कुटुंबाची सून वकील असलेली आरती, त्यांचा बचाव करते 'बाइज्जत' सुटका करते असं 'मुल्क'चं कथानक आहे.

आज देशात राजकारणासाठी जे धार्मिक ध्रुवीकरण चाललं आहे, त्या पार्श्वभूमीवर 'मुल्क'च्या केंद्रस्थानी एक सामान्य मुस्लिम कुटुंब असणं हेच एक धाडसी वेगळेपण प्रथमत: प्रेक्षकांसाठी आहे. पुन्हा या कुटुंबातील माणसांचं जगणं, आम भारतीयांप्रमाणे आहे; जे पूर्वार्धात अत्यंत सहजपणे दिग्दर्शक दाखवतो. पण त्याच वेळी मुस्लिमांमधली अस्वस्थ तरुणाई व त्यांचं समाजानं केलेलं 'घेटोनायझेशन' यामुळे, त्यातील मूठभर तरुण कडव्या इस्लामीकरणाच्या जाळ्यात सापडतात व दहशतवादाला 'जिहाद' कसं समजू लागतात, याचं दर्शन शाहिद या पात्राद्वारे प्रत्ययकारी रीतीनं सिनेमा पाहताना जाणवतं. मुख्य म्हणजे त्यानंतर पूर्ण कुटुंबाकडे मोहल्ला व हिंदू शेजारी देशद्रोही व दहशतवादी म्हणून कसे पाहू लागतात व त्यांना कोणकोणत्या प्रसंगातून जावं लागतं, हा सिनेमाचा प्रेक्षकांना अस्वस्थ करणारा भाग आहे. त्यामुळे हा एक राजकीय व सामाजिक भाष्य करणारा पोलिटिकल सिनेमा झाला आहे. तो आजच्या अस्वस्थ काळात येणं याला फार महत्त्व आहे. त्यानं भारतीयांचा मुस्लिमांकडे पाहण्याचा अनुदार दृष्टिकोन चर्चेत आणला आहे, समाजमाध्यमात त्यावर व्यापक चर्चा सुरू झाली आहे. एवढी की शेखर गुप्तासारखे राजकीय लेखन करणारे पत्रकार तसेच पाकिस्तानच्या 'डॉन' वृत्तपत्रानं व अरबस्तानच्या 'खालिज टाइम्स'नंही 'मुल्क'ची समीक्षा केली आहे. आणि अनुभव सिन्हा व अभिनेत्री तापसी पन्नू (जिनं आरती मोहंमदची भूमिका प्रभावीपणे साकारली आहे) यांचं सोशल मीडियावर ट्रोलिंग सुरू झालं, तेव्हा प्रतिवाद करताना त्यांनी मुलाखती व ट्विटरद्वारे आपली मते स्पष्टपणे नोंदवीत राष्ट्रवाद व दहशतवादाबाबत व्यापक चर्चा-संवाद सुरू केला, तो महत्त्वाचा आहे.

इथला हिंदू समाज मूलत: सहिष्णू आहे. मुस्लिमांसह सर्व धर्मीयांसोबत शांततामय सहअस्तित्व व सौहार्दासह जगणं म्हणजेच इथली सर्वसमावेशक **'गंगा-जमनी तहजिब'** म्हणजे संस्कृती आहे. पण धर्माधारित फाळणी, साठ-सत्तरच्या दशकात झालेल्या हिंदू-मुस्लिम दंगली (आठवा-भिवंडीची दंगल), शिक्षण व रोजगारात त्यांची झालेली पीछेहाट, त्यांच्यातील तरुणाईने छोटी-मोठी गुन्हेगारी ते स्मगलिंगकडे वळणं, बाबरी मशीद पाडली जाणं आणि आज अठरा टक्के मुस्लिमांना निवडणुकीच्या राजकारणात बेदखल करीत धर्माच्या नावानं ध्रुवीकरण करीत सत्तारूढ झालेलं आजचं सरकार... हे भारतीय मुस्लिम समाजाचे स्वातंत्र्योत्तर काळातील प्रमुख टप्पे आहेत. त्यांची आजची असुरक्षितता (ती मानसिक असली तरी खरी आहे), जगण्याची भ्रांत, त्याच वेळी इस्लामच्या नावानं फोफावलेला जागतिक दहशतवाद, काश्मीरचं सतत धगधगतं असणं, सीमापार आतंकवादाद्वारे मुस्लिम समाजमन कट्टरतेकडे वळवण्याचा पाकिस्तान खेळत असलेला डाव; त्याचा विपरीत परिणाम हिंदू मानसिकतेवर होऊन 'इस्लामफोबिया' होणं - त्या बळावर ध्रुवीकरण करीत निवडणुका लढवणं, हा प्रकार भारताचे दोन प्रमुख राष्ट्रव्यापी पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष व काँग्रेस करीत आहेत. त्याची धग आता साऱ्या देशाला बसू लागली आहे. अशा पार्श्वभूमीवर हे सारे प्रश्न 'मुल्क' या सिनेमानं ऐरणीवर व चर्चेत आणत नव-उग्र राष्ट्रवाद, त्याला मानवतेऐवजी धर्मवादाचं दिलेलं रूप आणि आतंकवाद म्हणजे काय यावर भाष्य करीत लोकशाहीला आवश्यक असणारा एक महत्त्वाचा संवाद सुरू केला आहे.

हे सारे प्रश्न दिग्दर्शकांनी कशा खुबीनं, प्रसंग व पात्रांद्वारे सिनेमात सादर केले आहेत, ते पाहण्याजोगे आहे. सिनेमाची सुरूवातच सिनेमातील बॉम्बस्फोटानंतर एनकाऊंटरमध्ये मारल्या गेलेल्या शाहिदच्या 'रॅडिकलायझेशन'ने होते. इस्लामी दहशतवादाची दीक्षा देणारा महफूज आलम त्याला सांगतो की, 'घुटने के नीचे पाजामा पहनकर, बारा रुपये की टोपी सरपर पहनकर पांच बार नमाज पढनेसे कोई मुसलमान नही होता।' आणि जिहाद करून 'लढकर हमे अपनी जगह बनानी है और इन्शाल्ला हम लढकर अपनी जगह यकिनन लेंगे।' या एका प्रसंगातून व दोन वाक्यातून दिग्दर्शकानं मुस्लिम तरुण कसा दहशतवादी जिहादकडे वळतो, हे प्रभावीपणे दाखवलं आहे.

आरती या हिंदू मुलीने मुस्लिम आफताब मोहंमदशी माणूस म्हणून लग्न केलं, त्याआड त्यांचे धर्म आले नव्हते, हे आपल्या सासूला सांगताना ती म्हणते की, ''आता जन्मास येणाऱ्या मुलाचा धर्म कोणता हे आफताब ठरवू पाहत आहे, ते मला साफ नामंजूर आहे...'' अशा आंतरधर्मीय विवाहात मुलीनं नवऱ्याचा धर्म स्वीकारून मुलांना तो धर्म दिला जातो. पण आजची पिढी त्याबाबत प्रश्न विचारते आहे, ते आरतीच्या नवऱ्याशी या संदर्भात झालेल्या घुसमटीतून व्यक्त झालं आहे.

चौबे हा मुरादअलीचा हिंदू शेजारी आहे. त्यानं बाबरी मशीद पाडल्यानंतर झालेल्या दंग्यांच्या वेळी शेजारधर्म निभावत मुरादचं रक्षण (१९९२ साली) केलं होतं, पण २०१८ येईतो पुलाखालून एवढं पाणी वाहून गेलं आहे की, चौबेला आपला मुलगा कट्टर हिंदू होणं मंजूर झालं आहे. मुरादचा पुतण्या दहशतवादी असल्याचं कळताच चौबे त्याला सुनावतो, ''एवढं सारं या देशानं तुम्हाला दिलं आहे, तरी आतंकवाद करणार असाल तर तुम्ही पाकिस्तानला का जात नाही?'' आणि मग मुरादअलीला प्रश्न पडतो की, ''शाहिद जरी आतंकवादी असला तरी मी- माझं कुटुंब देशद्रोही नाही, हे कसं त्यांना पटवून द्यायचं?'' तो एका हळव्या मन:स्थितीत आरतीला सांगतो, ''जब मेरी बाबी तबस्सुम निकाह कर के घर आई थी नयी नयी, बहोत लढती थी। कहती रहती बारबार की, मै उससे प्यार नही करता हूँ। मैं कहता - करता हूँ, बहोत करता हूँ। वो कहती-साबित करो... अब प्यार को कैसा साबित किया जाये? प्यार करके ही ना! आज अदालत मे कहा कि, मै साबित करू मेरा अपने मुल्कसे प्यार? कैसे साबित करू? बेटी, तु ये साबित करो अदालतमें! नही तो मै हार जाऊंगा - मैं - मैं देशद्रोही नहीं हूँ।''

मुरादच्या घरावर 'पाकिस्तान जाओ' असं लिहिलं जातं, त्यावरून काही मुस्लिम त्याला छेडतात, तेव्हा तो म्हणतो, 'पाकिस्तान ही लिखा है ना? अगर कुछ मुसलमान पाकिस्तान की जीत पर पटाखे फोडते है, तो लिखेंगे ही ना!' या संवादातून दिग्दर्शकांनी लहान-सहान कृत्ये कशी पूर्ण कौमला बदनाम करतात व इतरांना 'प्रेज्युडाईस' करतात, हे व्यक्त केलं आहे.

मुरादचा भाऊ आहे बिलाल. त्याबाबत सरकारी वकील संतोष आनंद कोर्टात युक्तिवाद करताना म्हणतो की, 'सात सौ साल पहले बिलाल पांच बार अजान देने का काम करता था। आज भी लाऊडस्पीकर से पाच बार अजान देकर बाताया जाता है की , ईश्वर एकही है - वो अल्लाह है। हमारे ब्रह्मा-विष्णु-महेशजी की तो कोई हैसियत नही रही।' हे वाक्य फार मार्मिक आहे, त्यातून रस्त्यावरही धर्म कसा आणला जातो व त्याची हिंदूंवर कशी प्रतिक्रिया उमटते हे दाखवून दिलं आहे. त्यावर शेवटी न्यायाधीशाची टिपणी पण मार्मिक व सटिक आहे. 'बिलाल नाम लेकर यदी आप पाच सौ साल पिछे जाओगे, तो पांच हजार साल पिछे जा सकते है। आज बिलाल नाम लेकर डिस्कस करते रहोगे, तो २०१८ के प्रॉब्लेम कैसे सॉल्व्ह करोगे?'

शेवटी आरती जो युक्तिवाद करते, त्यातून दिग्दर्शकाला काय सांगायचं आहे, हे व्यक्त केलं आहे.

**'पब्लिक प्रॉसिक्युटरने वाकई अच्छा शेर कहा है की, 'हम उन्हे अपना बनाए किस तरह? वो हमे अपना समझते ही नही।' ये केस है पुरा का पुरा - हम और वो का। अस अ‍ॅण्ड देम का। मुल्क कागीज की लकिरों से नही बनता, वो दिल-दिमाग मे बसता है, लेकिन हमने उसको हम और वो मे बाट दिया... ये केस आतंकवाद का है, रिलिजन का नही. धिस केस नॉट अबाऊट कम्युनल अ‍ॅक्ट, बट ऑफ क्रिमिनल अ‍ॅक्ट!'**

निकाल देताना न्यायाधीश मार्मिक पण नेमकी विधाने करतो, त्याद्वारे अनुभव सिन्हाने **'इस्लामफोबिया' मानसिकतेवर सहजपणे पण कठोर प्रहार केले आहेत. ''मुरादअलीजी, किसीने आप की दाढी का सवाल उठाया तो इमोशनल मत होना. ये किताब है - संविधान। उसके पहले पन्ने की फोटोकॉपीज बनावो दो चार और उनको दो। आप लोग अपने लडकों पर नजर रख नही पाये। संभालो उनको - किससे मिलते है... क्या करते है?''**

**इस्लाम के एजंट नही है आतंकवादी, वो इस्लाम के नमसे धंदा करते है। दानिशजी (पोलीस अधिकारी), आप प्रेज्युडिस है, अपना चष्मा साफ किजिए, दुनिया साफ हो जायेगी।**

**हम और वो मे समाज को बाटने की कोशिश नही करना चाहिये। हम अच्छे है, वो बुरे है... जब यह चर्चा होती है तो समझो की, इलेक्शन का टाइम आया है...'**

असे असंख्य छोटे-मोठे प्रसंग व संवाद यातून दिग्दर्शकाने 'मुल्क'मध्ये जो विचार प्रेक्षकांना दिला आहे तो महत्त्वाचा आहे. तो हा आहे की, नव-उग्र राष्ट्रवादानं धार्मिक वळण घेतलं आहे. त्याद्वारे सर्वच्या सर्व मुस्लिमांना देशद्रोही मनोमन मानत, काहींनी त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभं करून त्यांच्यात 'आयडेंटिटी क्रायसिस' निर्माण केला आहे. सर्व मुस्लिम आतंकवादी नसतात, पण प्रत्येक आतंकी मुस्लिमच कसा, या प्रच्छन्न प्रश्नात 'इस्लामफोबिया'कसा ठासून भरला आहे, हे परिणामकारक रीतीने दर्शविण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.

शांततावादी व देशप्रेमी मुस्लिमांचा प्रतिनिधी मुरादअली मोहंमद ही भूमिका ऋषी कपूरनं साकारली आहे. त्याचा 'अमर, अकबर अ‍ॅन्थनी' या चित्रपटातला प्रेमळ, दिलखुलास तरुण अकबर इलाहाबादी प्रेक्षकांच्या आजही स्मरणात आहे. त्याचा अकबर ते मुरादअली हा प्रवास केवळ प्रगल्भ होत जाणाऱ्या व्यक्तिरेखांचा नाही तर तो भारतीय समाजाच्या मुस्लिमांप्रति बदलत जाणाऱ्या दृष्टिकोनाचा आहे. तो देशासाठी इष्ट नाही, म्हणून **'हम और वो'**मधील फरक मिटला गेला पाहिजे. **जुना इतिहास उगाळीत बसलो तर आजचे कळीचे प्रश्न आपण कसे सोडवणार? हा न्यायाधीशाचा सवाल प्रातिनिधिक अर्थाने देशाच्या भवितव्याची चिंता असणाऱ्या सर्व सुजाण नागरिकांचा आहे.**

माझा शेवटचा टेक आहे तो 'मुल्क'मधून स्पष्ट केलेल्या दहशतवादाच्या व्याख्येबाबत. 'टेररिझम'का मतलब है राजनैतिक और सामाजिक उद्देश के लिए आम आदमीपर किया गया हिंसा का प्रयोग ही व्याख्या प्रमाण मानत युक्तिवाद करताना आरती म्हणते, 'अनटचेबिलिटी क्या टेररिझम नही है? आदिवासीपर होनेवाला अत्याचार टेररिझम नही है?' मुरादअलीचं एक विधान येथे नमूद केलं पाहिजे. 'खाली मारने से आतंकवाद नही होता. किसी को डराके कोने मे चुपचाप बिठाना भी आतंकवाद है जनाब!' यावर अधिक भाष्य करायची गरज नाही.

या लेखाचा शेवट मला अनुभव सिन्हांनी त्यांना ट्रोलिंग करणाऱ्या लोकांना उद्देशून जे पत्र ट्विटरवर लिहिलं, त्यातील दोन-तीन विधानांनी करायचा आहे. ते ट्रोलर्सना 'ए लोनली लाऊडस्पीकर ऑन पोल' असं संबोधत म्हणतात,

''तुम्ही ज्यांना ट्रोल करीत आहात म्हणजे मला व 'मुल्क'मधील कलावंतांना त्यांना स्वत:चा आवाज आहे, जो तुमच्या मालकांना (इथं मालक कोण हे सांगितलं पाहिजे का?) पसंत नाही. पाऊस येवो की ऊन पडो, तुमच्यासाठी काही फरक पडत नाही. त्यांचा द्वेष करण्याच्या तुमच्या नजरेत काही फरक पडत नाही. मला तुमची दया येते. हा सिनेमा तुम्ही जसा विचार करीत आहात, तसा नाहीय, तो तुमच्या मालकांचा (प्रपोगंडा करणारा) सिनेमा नाही. तो तुमच्याबद्दल आहे, माझ्याबद्दल आहे व प्रामुख्याने तो (सर्वां)बद्दल आहे.''

शेवटी आपण हे स्वच्छपणे समजून घेतलं पाहिजे की, हा देश-मुल्क, तुमच्या-माझ्या मनमस्तकात बसलेला आहे. **या देशाचे 'हम' आणि 'वो'मध्ये विभाजन करणे म्हणजे १९४७ प्रमाणे पुन्हा एकदा देशाची सामाजिक-मानसिक फाळणी करण्यासारखे आहे. हा देश 'गंगा-जमनी' तहजिबचा आहे. तो बहुधार्मिक व बहुसांस्कृतिक आहे. शांततामय सहअस्तित्व मान्य केलं, तरच आपला देश अभंग व एकसंध राहणार आहे. हे नीटपणे समजून घेण्यासाठी हा चित्रपट विचारप्रवृत्त करणारा आहे.**

❐

# पुस्तक परिचय

# स्वातंत्र्याची चोरी

■ **हिनाकौसर खान**

वयाच्या सातव्या वर्षी तिच्या केसांमध्ये शिरणारी उन्हाची किरणं, हवेचा झोत आणि पावसाचे थेंब... सारं काही थांबलं. अंगभर ढगळे कपडे आणि डोकं झाकणारा स्कार्फ - हिजाब आला, तोही सक्तीनं. एकाच वेळी असंख्य प्रकारची बंधनं अधोरेखित करत होता हा हिजाब, तर दुसरीकडं ती ज्या भूभागात राहत होती तिथं शिक्षण-नोकरी मिळवायला त्याचीच मदत घ्यावी लागत होती. तिच्या देशातल्या प्रत्येकीच्याच भाळी जणू ते जन्मत:च कोरून येतं. सक्तीनं. जबरदस्तीनं. प्रत्येक स्त्रीनं हिजाब घालायलाच हवा, असं तिच्या राष्ट्राचा कायदा सांगतो. **मासिह अलिन्जाद या मुक्त पत्रकार तरुणीला नको होती ही सक्ती, ही जबरदस्ती. तिने सक्तीचा हिजाब नाकारला. बंड केलं.** तिने तिच्या कुरळ्या मोकळ्या केसांत वाहतं वारं अनुभवून पाहिलं आणि जगभरातल्या स्त्रियांना विचारलं, ''हिजाब सक्तीने घालण्यावर जिचा विश्वास नसेल, ती किमान 'स्वातंत्र्याची चोरी' तर करूच शकते!''

... आणि बघता-बघता उभी राहिली एक चळवळ, पडद्याआड लपवलेल्या स्वातंत्र्याची...गुप्तपणे जगलेल्या स्वातंत्र्याची...**'माय स्टेल्दी फ्रीडम'ची!**

**मासिह अलिन्जाद ही बेचाळीस वर्षांची निर्भीड मुक्त पत्रकार आहे. 'द विंड इन माय हेअर : माय फाइट फॉर फ्रीडम इन मॉडर्न इराण' हे मासिहचे आत्मचरित्र ऑगस्ट २०१८ मध्ये प्रसिद्ध झालं आणि हे पुस्तक तिने 'माय स्टेल्दी फ्रीडम' व 'व्हाइट वेनस्डे कॅम्पेन'च्या धाडसी महिलांना अर्पण केले आहे.** या पुस्तकामुळे पुन्हा एकदा तिची 'स्वातंत्र्याची चोरी' ही चळवळ प्रकाशात आली.

> **ही चळवळ उभी राहिली ती मासिहच्या एका छोट्याशा फेसबुक पोस्टमुळे. इराणमधून हुसकावून लावण्यात आलेली मासिह अमेरिकेत आली, तेव्हा तिनं तिच्यावर लादल्या गेलेल्या हिजाबशी फारकत घेतली. तिला आता स्वातंत्र्य चोरण्याची जरुरी नव्हती. ती तिचे काही फोटो पाहत होती, त्या वेळी तिचा एक जुना फोटो हाती आला. लंडनमध्ये चेरी फुलांनी लगडलेल्या रस्त्यावरून ती धावत आहे, असा तिच्या पतीने -कांबिझने क्लिक केलेला फोटो होता. त्या फोटोत तिने केशरी रंगाचे जॅकेट परिधान केले होते. तिचे दोन्ही हात जगाला कवेत घेण्यासाठी फैलावले होते आणि वाहते वारे तिच्या केसांशी लगट करत होते.**

मासिह मूळची इराणची. तिची निर्भीड पत्रकारिता पाहता, ती देशासाठी फारच घातक आहे, असं वाटून वयाच्या तेहतिसाव्या वर्षी तिला इराणमधून हुसकावून लावण्यात आले. पण यामुळे मासिहची पत्रकारिता सुटली नाही, की संवेदनशीलता घटली नाही. ती सध्या न्यूयॉर्कमधील 'ब्रुकलिन'या भागात राहत आहे. विशेष म्हणजे इराणमधून बाहेर पडावं लागलं तरी ती मनानं कधीच बाहेर पडली नाही. देशाबाहेरूनही तिची पत्रकारिता इराणमधील महिलांचा आवाज, अन्याय-अत्याचाराच्या कथा आणि भ्रष्टाचारासारखे जटिल प्रश्न समोर आणत आहे.

'आय हॅव गॉट टू मच हेअर, टू मच व्हॉइस अॅण्ड आय अॅम टूमच ऑफ वुमन फॉर देम.' एका मुलाखतीत तिने स्वत:साठी

वापरलेलं हे वाक्य तिला अगदीच चपखल बसतं. तिच्या कुरळ्या केसांना हिजाबखाली आवरणं अवघड आहे, तिचा आवाज दाबणं कठीण आणि केस व आवाजाच्या माध्यमातून तिच्या स्त्रीत्वाला दडपण्याचे जे काही प्रयत्न झाले त्यांना ती खमकेपणाने पुरून उरली. म्हणूनच तिच्यासारख्या अनेकींच्या स्त्रीत्वाचा मुक्त हुंकार सांगणाऱ्या 'माय स्टेल्दी फ्रीडम' या सक्तीच्या हिजाबविरोधी चळवळीतील असंख्य अदृश्य बायकांचा ती खणखणीत दृश्य आवाज बनली आहे.

हा फोटो फेसबुकवर शेअर करत तिने खाली असा मजकूर लिहिला, *'मी जेव्हा केव्हा अशी मुक्तपणे धावते आणि माझे केस वाऱ्यासोबत डोलू लागतात, तेव्हा-तेव्हा मला आठवतं की - मी अशा एका देशातून आले आहे जिथं तीसएक वर्षं माझे केस शासनदरबारी बंदिवान होते. इराणच्या इस्लामिक रिपब्लिकमध्ये सत्तेवर असणाऱ्यांनी केसांच्या माध्यमातून बंदी घातली. इराणमधील रस्ते माझी आठवण काढत असतील. त्या रस्त्यांना माझे आनंदी अस्तित्व, माझं भरभर चालणं, माझं नाचणं, माझं हसणं... हे सारं काही आठवून चुकल्या -चुकल्यासारखं वाटत असेल. त्यांना माझी आठवण येत असेल याची मला खात्री आहे.'*

मासिहचा हा फोटो आणि या फोटोखालील मजकूर काही क्षणांत व्हायरल झाला. मासिहने केसांसंदर्भात 'बंदी' ही संज्ञा जाणीवपूर्वक वापरली होती. इराणी स्त्रियांना ही संज्ञा नेमकी कळली, कारण त्यांना असा मुक्त वावर नव्हता. या फोटोचा परिणाम काय होईल याची तिला अजिबातच कल्पना नव्हती, मात्र दिवसभरात हा फोटो मजकुरासह ७४१ वेळा शेअर झाला. १४ हजार लाइक्स मिळाले आणि ५०० जणांनी त्यावर कॉमेंट केल्या होत्या. काहींनी मासिहचा हेवा केला होता, तर काहींनी हे स्वातंत्र्य इराणमध्ये नाही म्हणून दु:ख व्यक्त केले होते.

मासिह या प्रतिसादाने उत्तेजित झाली, आनंदून गेली. हिजाबच्या सक्तीबाबत इतकी खदखद आहे, हे तिच्या लक्षात आलं. तिच्या फोटोबाबत तक्रार करणाऱ्यांचा सूरही तिला कळत होता. मासिहने त्या तक्रारीला उत्तर म्हणून तिचा तेहरान ते गोमिकाला या प्रवासातील गाडी चालवताना फोटो टाकला. या फोटोतही तिने हिजाब घातलेला नव्हता. चोरलेल्या स्वातंत्र्यरक्षणाचा फोटो शेअर करून तिने इराणी स्त्रियांना विचारले की, अशा रीतीने तुम्ही कधी गुपचूपपणे स्वातंत्र्य अनुभवलं आहे? मासिहला या गोष्टीची निश्चितच कल्पना होती की, इथल्या स्त्रियांनी त्यांच्या-त्यांच्या परीने लहान-मोठं स्वातंत्र्य मिळवलंच असणार. तिच्यासारख्या असंख्य इराणी स्त्रियांना हिजाबची सक्ती नको असणार आणि त्यांनी केव्हा तरी पोलिसांच्या अनुपस्थितीत, गाडी चालवताना, निर्जन रस्त्यावर, वाळवंटात, जंगलात किंवा कुठल्या तरी समुद्रकिनारी अलवारपणे हिजाब काढून मोकळा श्वास घेतला असणार. त्यांच्या केसांना मुक्त वाऱ्याच्या हवाली सोपवलं असणार आणि त्याची आठवण म्हणून फोटोही काढला असणार. बहुतांश इराणी स्त्रियांकडं अशी मुक्ततेची, चोरलेल्या स्वातंत्र्याची कहाणी आणि फोटो होताच. मासिहच्या इराणमधील फोटोनंतर तर तिला तिच्या अपेक्षेपेक्षाही प्रचंड प्रतिसाद लाभला. भराभर फोटो येऊ लागले. काहींनी आपले नाव गुपित ठेवले. काहींनी पाठमोरे फोटो पाठवले. एप्रिल २०१४ मध्ये मासिहच्या या दोन पोस्टने चांगलीच खळबळ उडवली. शेवटी मासिहच्या एका वाचकाने तिच्यासाठी एक फेसबुक पेज बनवले, **'आझादी यावाशकी' या नावाने! चोरलेल्या स्वातंत्र्याला पर्शियन भाषेत आझादी यावाशकी म्हणतात.** त्या पेजनिर्मातीने तिला अॅडमिन केले. दि. ३ मे २०१४ रोजी हे पेज जगापुढे आले. मासिहच्या मेलबॉक्समध्ये अनेक इराणी महिलांचे फोटो येऊ लागले. हिजाब न घातलेले, स्कार्फ न घातलेले इराणी स्त्रियांचा तो उत्साह आणि त्यांची निर्भयता पाहून मासिहला उचंबळून येत असे. हे सारं पर्शियन भाषेपुरतं मर्यादित राहू नये म्हणून मासिहने या पेजचं स्वरूप इंग्रजी व पर्शियन असं दोन्ही भाषांत केलं आणि पेजचं नवं नाव पुढे आलं **- 'माय स्टेल्दी फ्रीडम'.**

या पेजवर प्रसिद्ध होणाऱ्या फोटोंवरून हिजाबचा कायदा मोडला म्हणून त्यांना अटक होण्याची शक्यता होती. पण या बायकांना त्याची फिकीर वाटत नव्हती. त्यांच्या स्वातंत्र्याच्या या क्षणाचा त्यांना आनंद घ्यायचाय, हे दिसत होतं. मुख्य म्हणजे त्या प्रत्येकीच्या मनोगतातला समान धागा हा होता की, **'हिजाब ही माझी निवड नाही आणि मला निवडीचे स्वातंत्र्य हवे.'** पाहता -पाहता या पेजवरचे ट्रॅफिक वाढले. दर दिवसाला हजारो जण हे फेसबुक पेज जॉइन करू लागले. तीन दिवसांत सत्तावीस हजार फॅन्स/फॉलोअर्स तयार झाले. ही छोटी गोष्ट नव्हती. ७ मे २०१४ ला एका रेडिओ पत्रकाराने या पेजची बातमी केली आणि अन्य पाश्चिमात्य या चळवळीच्या पाठीशी उभी राहिली.

पण हे इतकं शांतपणे सुरू नव्हतं. त्याचे पडसाद उमटू लागले होते. इराणी स्त्रियांना त्यांची किंमत मोजावी लागत होती. त्यांना भर रस्त्यात दगडाने मारण्याची शिक्षा होऊ लागली. काहींना तुरुंगवास. इतकंच नव्हे, तर इराणमधील सर्वांत प्रसिद्ध असलेले पर्यटनस्थळ असफाहन इथल्या स्त्रियांवर तर अॅसिड अॅटॅक झाले. या अॅटॅकमध्ये एकीचा जीव गेला, एकीचा डोळा गेला. या सर्व बातम्या दाबल्या गेल्या, मात्र सोशल माध्यमातून त्या पसरत राहिल्या. या घटनेनंतर

मासिहचा अर्थातच गोंधळ उडाला. इराणमधल्या स्त्रिया जोखीम घेत आहेत, हे ठाऊक असताना त्यांनी कुठल्याही संकटात सापडावं अशी तिची इच्छा नव्हती. आपण काही चुकत तर नाही ना, असं तिला वाटू लागलं. यापुढे फेसबुक पेजचे काय करायचे, असा विचार डोक्यात सुरू असतानाच तिने तिचा इनबॉक्स पाहिला; तर ॲसिड ॲटॅक झाले त्या दिवशी व त्यानंतर आठवडाभर आलेल्या फोटोंत सर्वाधिक फोटो असफाहन याच शहरांतून होते. **'ॲसिड इज नॉट आवर राइट, वुई डोन्ट डिझर्व्ह इट' म्हणत बायकांनी 'ॲसिड ॲटॅक झाले तरी आपण गप्प राहणार नाही, आपण माघार घ्यायची नाही' असे सांगणारे असंख्य मेल तिला आले होते. या इराणी धैर्यवान स्त्रियाच मासिहची ताकद बनल्या.**

मासिहची 'माय स्टेल्दी फ्रीडम' ही सोशल मीडियावरील ऑनलाइन चळवळ असल्याने एक आभासी नोंद म्हणून तुम्ही या चळवळीकडे पाठ फिरवू शकत नाही अशी ग्वाहीच जणू या स्त्रिया देत होत्या. हे माध्यम जरी आभासी असले तरी या माध्यमावर नोंद करणाऱ्या प्रत्येक स्त्रीनं घेतलेली जोखीम जिवावर बेतण्याइतपत धोकादायक होती... आहे. थेट शासनाच्याच डोळ्यांत धूळ फेकून ही स्वातंत्र्यचोरी किती महागात पडणारी असेल याची कल्पना न केलेलीच बरी! इतकी बंदिस्त आणि हुकूमशाही परिस्थिती असतानाही आपल्या चोरीची अशी जगजाहीर वाच्यता करत मासिहसारख्या असंख्य निर्भीड इराणी स्त्रियांनी तिथल्या दमनशाहीविरुद्ध बंड पुकारले.

इतर बायकांचा जीव धोक्यात घालणारी मासिह ही लंडन-न्यूयॉर्कमध्ये राहणारी कुणी उच्च, श्रीमंत घरातली, आरामात वाढलेली स्त्री आहे असा समज करून घेणार असाल, तर तिची पार्श्वभूमी समजून घ्यायला हवी.

मासिहचा जन्म ११ सप्टेंबर १९७६ रोजी, आगाजान आणि जरीन या दाम्पत्याच्या घरी सहाव्या अपत्याच्या रूपानं झाला. नकाशावरही इराणमधील गोमिकाला या खेड्याचा बिंदू दिसत नाही इतक्या चिमुकल्या खेड्यात तिचा जन्म झाला. मीना, अली, मोहसीन, हमीद, मेहरी ही तिची पाच भावंडं. तिचे वडील छोटे विक्रेते होते, तर आई अशिक्षित. दोन खोल्यांचं घर. प्रचंड गरिबी आणि तितकीच पारंपरिक धाटणी. घरात गरिबी होती तरी प्रेम आणि आनंद होता. वडील शिस्तीचे असले तरी प्रेमळ होते आणि म्हणूनच आपले लहानपण खूपच मजेत गेल्याचं मासिह सांगते.

मासिहचा जन्म झाला त्याच्यानंतर दोन वर्षांतच इराणच्या राजकारणात उलथापालथ झाली आणि इस्लामिक क्रांती झाली. इराणवर हुकूमशाही मार्गाने आधुनिकीकरण लादू पाहणारे पर्शियन राजे 'शाह मोहम्मद रझा पेहलवी' यांना देशातून हुसकावून लावण्यात आले आणि इस्लामिक रिपब्लिकची स्थापना झाली. या क्रांतीतून तत्कालीन जनमानसाच्या खूप अपेक्षा होत्या. देशात 'अच्छे दिन' येणार अशी त्यांना खात्री होती. गरिबांच्या हाताला काम मिळेल, मुलांना उत्तम शिक्षण मिळेल, जीवनमान उंचावेल अशी अपेक्षा होती. त्यामुळे या क्रांतीला इराणच्या नागरिकांनी पाठिंबा दिला. मात्र प्रत्यक्षात घडलं उलटंच. संपूर्ण इराणचे इस्लामीकरण करण्याची सुरुवात झाली. शरिया कायदा आणण्यात आला. मानवाधिकारांचे हनन सुरू झाले. मुख्यत्वेकरून स्त्रिया या क्रांतीच्या बळी ठरल्या. त्यापूर्वी त्यांना समान वागणूक होती. हिजाबची सक्ती नव्हती. त्या मुक्तपणे वावरत होत्या, उच्चपदस्थ होत्या, न्यायाधीश पदावर होत्या. त्यांना संगीत-गाण्याची मुभा होती. हसण्या-खेळण्यावर बंधन नव्हते. स्टेडियममध्ये खेळ पाहण्यावर बंदी नव्हती. मात्र त्यांच्या हसण्यावर, आनंद घेण्यावर हळूहळू बंदी येत गेली. एकएक करून त्यांना कोशात ढकलण्यास सुरुवात झाली आणि १९८३ मध्ये हिजाबचा पेहराव सक्तीचा करणारा कायदा अस्तित्वात आला. या कायद्याने मुलगी सात वर्षांची झाली की, तिने हिजाब घालणे बंधनकारक ठरले. हिजाब व्यवस्थित घेतला नाही किंवा डोक्यावरचे - अगदी कपाळाजवळचे केस जरी दिसले तरी त्यासाठी कायद्याने कठोर शिक्षाही ठरविण्यात आली. हिजाब घालणाऱ्या स्त्रियांनाच शिक्षण, नोकरी करण्याची मुभा कायद्याने दिली. **हिजाब हा काही मीटर कापडाचा तुकडा न उरता त्यांच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनवण्यात आला. शरीराचाच एक भाग.**

मासिहचे वडील पारंपरिक विचारांचे होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलींनाही हिजाब सक्तीचा केला. मासिहसुद्धा लहान वयातच हिजाब घालू लागली. पण त्याच वेळी ती पाहत होती की, तिच्या सख्ख्या मोठ्या भावावर मात्र कुठलीच बंधनं नव्हती. तो मुक्तपणे रस्त्यांवरून धावू शकत असे, फिरू शकत असे, उन्हाळ्यात पोहू शकत असे, गाडी चालवू शकत असे. ही असमानता तिला डाचत होती, ती त्याविरुद्ध बोलत होती.

मासिह पहिल्यापासूनच चुकीच्या, अन्याय्य बाबींच्या विरोधात उभी राहत होती. शासनाच्या चुकीच्या बाबींवर बोट ठेवत होती. शाळेतल्या तिच्या ग्रुपमध्ये कम्युनिस्ट विचारसरणीची पुस्तके सापडल्याने वयाच्या अठराव्या वर्षी तिला अटक झाली. ज्या दिवशी तिचं लग्न होतं, त्या दिवशी ती व तिचा होणारा नवरा दोघांना अटक झाली. पाच वर्षांची शिक्षा सुनावली गेली. कालांतराने तिच्याविरुद्ध पुरेसे पुरावे न मिळाल्याने कोर्टाने तिची सुटका केली. त्यानंतरच्या नजीकच्या काळात तिच्या वैयक्तिक आयुष्यातही उलथापालथ झाली होती. तिच्या पतीने तिला तलाक दिला आणि त्यांच्या लहानग्या मुलाचा ताबा

त्याला मिळाला होता. तिथून पुढे मुलाचा ताबा मिळवण्याचा तिचा संघर्ष सुरू झाला. दरम्यान तिने पत्रकारितेत प्रवेश करून राजकीय पत्रकार म्हणून ओळख निर्माण केली होती. स्वतंत्र व्यक्ती बनली होती.

इराणच्या 'मजलिस' या संसदीय भवनात जाऊन रिपोर्टिंग करणे, हा तिच्या जगण्याचा भाग झाला. तिने अनेक शासनकर्त्यांना अडचणीत आणणारे प्रश्न केले. मुलाखती घेतल्या. काही वर्षांतच तिच्या निर्भीड पत्रकारितेमुळे तिला मजलिसमध्ये येण्यास बंदी करण्यात आली. तिच्या मुक्त वृत्तीची किंमत तिला मोजावी लागणार होतीच. २००९ च्या इराणच्या निवडणुकीचा काळ जवळ आला होता. तेव्हा पुन्हा तुरुंगात डांबण्यात येणार असल्याची कुणकुण तिला लागली. ३३ वर्षे ज्या देशात ती राहत होती तिथून बाहेर पडली नाही, तर या वेळेस तिच्याबाबत फार मोठा घातपात होणार असं दिसत होतं म्हणून तिला नाइलाजास्तव देश सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला. एका अर्थी देशानेच तिला हुसकावून लावले. तिथून ती इंग्लंडमध्ये गेली. इराणमध्ये तुरुंगवास झाल्याने पदवी शिक्षण घेऊ न शकणाऱ्या तिला इंग्लंडमध्ये ती संधी मिळाली. मासिहने मागील नऊ वर्षांपासून तिच्या कुटुंबीयांना पाहिले नाही. सुरुवातीची पाच वर्षे लंडनमध्ये राहिल्यानंतर २०१४ पासून ती न्यूयॉर्कमध्ये वास्तव्यास आहे. पत्रकारितेबरोबरच २०१० पासून तिने तिच्या कामाचे लक्ष्य मानवाधिकार प्रश्नांकडे वळवायचे ठरवले.

मग 'माय स्टेल्दी फ्रीडम'सारखी एक कॅम्पेन उभी राहिली. जिथं इराणीच नव्हे, तर ज्या कुठल्या देशांत स्त्रियांवर दमनशाही अवलंबली होती, त्या सगळ्यांना हक्काचं एक व्यासपीठच मिळालं. मासिहचा विरोध हिजाबला नाही, मात्र त्याच्या सक्तीला जरूर आहे. इराण या तिच्या मायदेशात प्रत्येक स्त्रीला स्वत:साठी हिजाब निवडण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार असायला हवा. **'इराणच्या शेजारील इतर मुस्लिम राष्ट्रांमध्ये, उदाहरणार्थ - तुर्की, पाकिस्तान, अझरबैजान, तुर्कमेनिस्तान, इराक, लेबनन, सिरिया या देशांत धर्माचा प्रभाव असूनही हिजाबची अशी सक्ती नाही; मग आपल्या देशात का?' म्हणत मासिहने हा लढा उभा केला.**

मासिह म्हणते,''मी स्वत: तिसेक वर्षे हिजाब वापरला आहे. इतक्या वर्षांनंतर हिजाब आपल्या शरीराचाच भाग बनून गेलेला असतो. माझ्यासाठीसुद्धा हिजाब न घालणे अवघड होते. पण माझ्यावर सक्तीनं लादलेल्या त्या हिजाबमधून मला बाहेरही पडायचं होतं. माझ्या कुटुंबात माझी आई नखशिखांत हिजाबमध्येच असते. बहिणीही पूर्णवेळ - अगदी झोपतानाही हिजाब घालतात. माझा विरोध हिजाबला नसून हिजाबच्या सक्तीला आहे. हिजाब घालणाऱ्या व न घालणाऱ्या दोन्ही व्यक्तींना एकत्र राहता आले पाहिजे.''

केवळ हिजाब वापरण्यास तयार नसणाऱ्याच मैत्रिणी यावर व्यक्त होत होत्या तर असं नव्हे. काही जणींनी स्वत: हिजाबचा स्वीकार केला आहे, मात्र तरीही त्यांना इतरांबाबत सक्ती नको होती.

मासिहने तिच्या पुस्तकात 'द विंड इन माय हेअर'मध्ये म्हटले आहे की - तिची सर्वांत आवडती पोस्ट कोणती आहे, तर एका महिलेने नखशिखांत हिजाब घातला आहे आणि चेहऱ्यापुढे एक पाटी धरली आहे. त्यामुळे त्यात फक्त तिचे डोळे दिसत आहेत. त्या पाटीवर लिहिले आहे, 'आय ॲम ॲन इराणीयन वुमन, ॲण्ड आय बिलिव्ह इन हिजाब ॲण्ड ॲट द सेम टाइम आय अभोर कंपलसरी हिजाब' **(मी इराणीयन स्त्री आहे आणि माझा हिजाब पेहरावावर विश्वास आहे, मात्र त्याच वेळी हिजाबच्या सक्तीची निंदा करते. तिरस्कार करते.)** मासिहला हेच तर अपेक्षित होते की, हिजाबची निवड जिची-तिची असावी आणि जबरदस्तीचा कायदा नसावा. मासिह म्हणते, ''इराणी स्त्रिया मुळातच निर्भीड असतात. इराणी स्त्रियांसारखं भयमुक्त होता आले पाहिजे. जिथं तुमच्यावर सतत पहारा आणि सतत दडपशाही असते, तिथल्या स्त्रियांना निर्भय होण्याशिवाय पर्यायच नसतो.''

या फेसबुक पेजने महिन्याभरताच पाच दशलक्ष लोकांचा पाठिंबा मिळवला होता. इराणी स्त्रिया या माध्यमातून उघडपणे सांगत होत्या की, त्यांना जर हिजाब निवडण्याचा अधिकार असता तर त्यांनी नक्कीच नाकारला असता. या कॅम्पेनमधून जाणारा हा मेसेज इराणमधल्या धार्मिक नेतृत्वासाठी धोक्याचा होता. या कॅम्पेनमध्ये स्त्रियांनी तर सहभाग घेतलाच, परंतु पुरुषही स्त्रियांच्या सोबतीने उभे राहिले. अल्पावधीत एक कोटी नागरिक या चळवळीचे पाठीराखे बनले. मात्र तिला विविध प्रकारच्या धमक्या येऊ लागल्या. कुणी तरी पैसा पुरवत असेल इथपासून ते तिला इस्रायलची फूस आहे इथपर्यंत अनेक कहाण्यांत तिला गोवण्यात आले. आरोपांच्या फैरी उडवण्यात आल्या. इतकं करूनही ती डगमगली नाही, तेव्हा एक विचित्र प्रकार घडला.

इराणच्या स्टेट न्यूज चॅनेलवर लंडनमध्ये मासिहवर बलात्कार झाल्याची बातमी प्रदर्शित झाली. ''मासिहच्या मुलासमोरच तीन जणांनी तिच्यावर बलात्कार केला'' अशा आशयाची फेकन्यूज होती. मासिहने हिजाब न घातल्याने तिच्यावर हे संकट कोसळलं, अशी भीती निर्माण करण्याचा शासनाचा कट होता. बलात्काराची घटना म्हणजे स्त्रीनेच पुरुषांना चेतवले, असा अर्थ इराणमध्ये काढला जातो. त्यामुळे मासिहच्या कुटुंबीयांना त्यांच्या छोट्या गावात नाचक्की सहन करावी लागली. या घटनेद्वारे मासिहचे मनोबल ढासळवण्याचेही प्रयत्न झाले. मात्र ती मागे हटली नाही. इराणमधल्या स्त्रियांना सशक्त पाठिंबा आणि वेळप्रसंगी तुरुंगातही जाण्याची तयारी या दोन्ही गोष्टींना मासिहचा विश्वास खरं तर वाढतच गेला.

इराणमध्ये पायाभूत सुविधांचे इतके महत्त्वाचे प्रश्न असताना मासिहने हिजाबचा हा छोटा मुद्दा इतका का उचलून धरला आहे, असाही सवाल तिला डाव्या विचारसरणींच्या लोकांनी केला. पण मासिहला हा हिजाबचा मुद्दा लहान वाटत नाही. दमनशाहीचे ते एक दृश्य स्वरूप वाटते आणि वयाच्या सातव्या वर्षीच जे स्त्रियांवर लादले जाते, ती गोष्ट लहान कशी असेल? पायाभूत सुविधांचे प्रश्न आहेतच, त्या मिळायलाच हव्यात, पण महिलांच्या सामाजिक स्वातंत्र्याची किंमत चुकवून नव्हे. महिलांचे व्यक्तिस्वातंत्र्य कुठल्याच राज्यकर्त्यांच्या अजेंड्यावर का नाही, असा प्रतिप्रश्न करून ती सक्तीचा मुद्दा पुन्हा अधोरेखित करते.

या कॅम्पेनमुळे हिजाबची सक्ती करणारा कायदा तातडीने बदलेल, अशी भाबडी अपेक्षा तिला नव्हतीच. पण यातून तिला सांस्कृतिक उलथापालथ अपेक्षित होती. नाकारण्याच्या, पुढे येण्याच्या महिलांपुढे अनेकानेक संधी आहेत याची जाणीव त्यांना करून द्यायची होती आणि त्याला सुरुवात नक्कीच झाली होती. पुढे आलेल्या या स्त्रियांना स्त्रीवाद कळत नाही, त्यांना राजकारणाशीही देणं-घेणं नाही, त्या कार्यकर्त्या नाहीत, पुरोगामित्व कशाशी खातात त्यांना ठाऊक नाही. या सगळ्या सर्वसामान्य स्त्रिया. ज्यांनी हिजाबची सक्ती व त्याबरोबर येणाऱ्या इतर बंधनांचा अनुभव घेतला, त्या सर्वसामान्य स्त्रिया पुढे आल्या. इतकंच नव्हे तर, या इराणी स्त्रिया आपल्या कथा-कहाण्या-फोटो माध्यमांवर टाकण्याची जोखीम घेऊन रस्त्यावर मार खायला किंवा तुरुंगातही जायला तयार झाल्या. कित्येकींना तर हा क्रूर अनुभव आलाच, पण त्यांनी माघार घेतली नाही.

सध्याच्या काळात इराणमध्ये हिजाबच्या मुद्यावरून रण पेटले आहे. शासनाने बजेटमध्ये हिजाबच्या संरक्षणासाठी/सक्तीसाठी १७० कोटी अमेरिकन डॉलर्स इतकी रक्कम मंजूर केली आहे, जिथं पर्यावरणाच्या संरक्षणासाठी केवळ पाच कोटी अमेरिकन डॉलर्स मंजूर केले आहेत. याउलट मासिह म्हणते, ''आमच्याकडे केवळ कॉम्प्युटर, मोबाईल आणि सोशल माध्यमे - ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि इतर अशी काही मोजकीच आयुधं आहेत आणि युद्ध तर सुरू झाले आहे.''

उदाहरण घ्यायचं तर मागच्याच वर्षीची घटना. दि. २७ डिसेंबर २०१७ रोजी ३१ वर्षीय मोवहेद नावाची महिला तेहरानमधील रिव्होल्यूशन स्ट्रीट या चौकातील ५ फूट उंच युटिलिटी बॉक्सवर चढली आणि तिने डोक्याचा स्कार्फ काढून तो सर्वांना दिसेल अशा रीतीने खांबाला बांधला. हिजाबच्या सक्तीविरुद्ध तिने केलेल्या या निषेधापायी तिला अटक झाली. दुसऱ्या दिवशी अशाच रीतीने माशाद या शहरात निषेध झाला. तो व्हिडीओदेखील व्हायरल झाला. पोलिसांनी अटकमोहीम सुरू केली. २५ जणांचा मृत्यू आणि निषेधकर्त्या ३७०० जणांना अटक झाली. मोवहेदला गायब करण्यात आले. मासिहने ही घटना उचलून धरली. आंतरराष्ट्रीय दबावानंतर मोवहेदची सुटका झाली. महिला डोक्यावरचा स्कार्फ काढून सक्तीच्या हिजाबचा निषेध जागोजागी करत आहेत. हिजाबविरोधी असणाऱ्या तीस कार्यकर्त्यांना अटक झाली आहे. मात्र आज तिथल्या स्त्रिया ओरडून सांगत आहेत, 'माझ्या शरीराचं काय करायचं हे सांगणाऱ्या शासनाला मी वैतागले आहे.' तर कुणी म्हणत आहे, 'आज जर तुम्ही मला अटक कराल तर लक्षात घ्या, माझ्यासारख्या अनेक जणी निषेधासाठी रस्त्यावर येतील.'

इतकी उलथापालथ घडत असतानाही काहींनी 'स्वातंत्र्याची चोरी' या शब्दालाच विरोध केला. जे चोरून मिळवावं लागतं ते स्वातंत्र्य कसं म्हणता, अशी हेटाळणी करण्यात आली. पण मासिह म्हणते, **''गुपचूप, चोरून मिळवलेलं स्वातंत्र्य हे स्वातंत्र्य नाहीच; मात्र जेव्हा इराणी स्त्रिया त्यांच्या या चोरीची सोशल माध्यमावर जाहीर मांडणी करतात, तेव्हा तिथं गुपित असं काहीच उरत नाही, उलट ते स्वातंत्र्याच्या मागणीचं जाहीर व्यासपीठ बनून जाते आणि जोवर आम्हा सगळ्या जणींच्या केसांशी वाऱ्याची झुळूक हितगुज करत नाही, आम्ही आमच्या केसांत वारा अनुभवत नाही, तोवर हा संघर्ष सुरूच राहील! उघडपणे स्वातंत्र्याची चोरी होतच राहील...! ''**

❐

**''पारतंत्र्यात असताना राष्ट्रवाद ही सर्वांना एकवटणारी ताकद देणारी शक्ती असते. नंतर मात्र ती संकुचितवादाकडे जाते. प्रभुत्ववाद जन्मास येतो. आणि त्याची अखेर सर्वनाशात होते.''**

**- पं. जवाहरलाल नेहरू**

# आंतरजातीय विवाह व जातिनिर्मूलन

■ सुरेश सावंत

काही महिन्यांपूर्वी आंध्र प्रदेशातील एका खुनाने देशातील संवेदनशील माणसे पार हादरून गेली. प्रणय व अमृता या दोन तरुण मुलांनी आपल्या पसंतीने प्रेमविवाह केला. त्यांच्या जाती वेगळ्या होत्या. त्यात अमृता वरच्या जातीची. तिचे वडील बिल्डर. प्रणय दलित. तिच्या घरच्यांना हे आंतरजातीय-मुख्यत: खालच्या जातीतल्या मुलाशी केलेले लग्न आपल्या इभ्रतीला काळिमा फासणारे वाटले आणि त्यांनी याचा सूड घ्यायला प्रणयचा खून केला. अमृता या वेळी गरोदर होती. अगदी लाडात वाढविलेल्या आपल्या मुलीच्या भावनांचा चक्काचूर करून तिचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याइतपत हा जातीचा अहंकार माणसाला आंधळा करतो, हे भयानक आहे. सैराट सिनेमातही आपण हेच पाहिले. या घटना आज देशात घडत आहेत. संविधानाने व्यक्तीला दिलेला समानतेचा अधिकार, विचारांचे स्वातंत्र्य, व्यक्तीची प्रतिष्ठा आणि एकूणच सामाजिक न्याय अशा प्रकारे धाब्यावर बसवला जातो आहे. सगळ्या जातीपातींचा व तत्सम सामाजिक भेदांचा विलय होऊन 'मी प्रथम भारतीय आहे व अंतिमतःही भारतीय आहे.' ही संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपेक्षिलेली ओळख प्रत्यक्षात यायला अजून फार अवकाश आहे, त्यासाठी बरेच प्रयास आपल्याला करावे लागणार आहेत हेच यातून लक्षात येते.

असे प्रयास करण्यासाठी वास्तवाची नीट नोंद घेणे गरजेचे आहे. हे भयानक वास्तव जसे एका बाजूला आहे, तसे दुसरीही एक वस्तुस्थिती त्याच वेळी समाजात विराजमान आहे. सगळ्याच आंतरजातीय लग्नांची प्रणय-अमृतासारखी किंवा सैराटमध्ये दाखवली तशी क्रूर परिणती होते असे नाही. बहुसंख्य लग्ने विविध अडचणी, विरोधांतून निभत असतात. अशा निभणाऱ्या लग्नांची बातमी होत नसल्याने ती समाजासमोर ठळकपणे येत नाहीत. आंतरजातीय लग्नांचे प्रमाण वाढते आहे. अर्थात, आजही एकूण लग्नांतली ७-८ टक्केच लग्ने आंतरजातीय होतात. ठरवून करायचे विवाह काही आंतरजातीय होत नाहीत. झाले तरी ते अपवादात्मक. तथापि, दिशा आंतरजातीय लग्नांचे प्रमाण वाढण्याची व निभण्याचीच आहे, असे दिसते. कोकणातील माझ्या वाडीत आता ४० पैकी ७ घरांत आंतरजातीय लग्ने झालीत. २७ वर्षांपूर्वी माझे झाले ते पहिले आंतरजातीय लग्न होते. या आंतरजातीय लग्नांत माळी, मराठा, सोनार, चांभार आदी जाती आहेत. अन्य वाड्यांतही हीच स्थिती दिसते. सुतारवाडीतील एकाशी बोलताना तुमचा आंतरजातीय लग्नाला पाठिंबा आहे का, विचारले. त्यांचे उत्तर नाही असेच होते. पण त्यांनी स्वत:च्या मुलीच्या आंतरजातीय लग्नाला रुकार दिला होता. असे का, विचारल्यावर, तिने काही बरेवाईट करू नये म्हणून, असे त्यांचे उत्तर होते.

सुतारवाडीतील हे इसम सामान्य जनांतले, जातीला धरून, जातीच्या समजुतींचे पालन करत जाणारे आहेत. मुलीच्या प्रेमापोटी, नव्या काळाची अपरिहार्यता म्हणून त्यांनी मुलीचे आंतरजातीय लग्न स्वीकारले, सहन केले. पण चळवळीतील आंतरजातीय लग्ने झालेल्यांचाही आपल्या मुलांची लग्ने जातीत, किमान वर्गात व्हावीत असा प्रयत्न असतो, असेही दिसते. प्रतिष्ठेची वारुळे आपल्या नकळत आपल्या मनावर चढत असतात. ती झुगारण्याचे प्रयास

जाणीवपूर्वक करावे लागतात.

जे अपरिहार्यता म्हणून आंतरजातीय लग्नाला तयार होतात, त्यांचा जय भीमवाले व मुसलमान नको यावर कटाक्ष असतो. जातिनिर्मूलनासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी आंतरजातीय विवाह हा एक महत्त्वाचा उपाय नोंदवला आहे. पण म्हणून ज्यांना जय भीमवाले संबोधले जाते ते बौद्ध हे आंतरजातीय विवाहांच्या बाजूनेच असतात, असे चित्र नाही. त्यांची लग्ने बौद्धांतच करायचा प्रयत्न असतो. मुलगी परजातीची (तीही तथाकथित वरच्या) असेल तर असे लग्न ते चालवून घेतात. पण आपली मुलगी बाहेरच्याशी लग्न करत असेल तर यांचा विरोधच असतो. अशाच एका लग्नाला विरोध असण्याचे कारण कळले, ते मोठे रोचक पण चिंताजनक आहे. बाबासाहेबांनी भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न पाहिले होते. आमची मुलगी परजातीत गेली तर भारत बौद्धमय करण्याचा कार्यक्रम लांबणीवर पडतो म्हणून या मंडळींचा या आंतरजातीय लग्नाला विरोध होता.

सरमिसळ वाढणाऱ्या समाजात प्रेमप्रकरण हे आंतरजातीयच होणार. योगायोगाने जातीत होईल. पण ही लग्ने कोणी जाती मोडायला करत नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. प्रेमात पडणाऱ्यांपैकी काहींना तर लग्नाच्या वेळीच जात अंगावर येताना दिसते. त्यांना आधी असे काही आहे याची कल्पनाच नसते. अशा वेळी काही मुलं-मुली पालकांच्या इच्छेपुढे मान तुकवून माघार घेतात. तर काहींना परस्परांशिवाय जगण्याची कल्पनाच सहन होत नाही व ती मुले एकतर पळून जातात, सगळी खडतर दिव्ये (सैराटसारखी) पार पाडतात किंवा आत्महत्या करून जीवनाला स्थगिती देतात.

आंतरजातीय लग्ने वाढत आहेत, निभत आहेत ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन तरुण मुला-मुलींना त्यादृष्टीने तयार करणे, त्यांचे समुपदेशन करणे, प्रबोधन करणे, समता व न्यायाच्या पातळीवरच्या समाजाचे स्वप्न त्यांच्या मनात निर्माण करणे गरजेचे आहे. तरच ही लग्ने जात मोडण्याच्या दिशेने जाऊ शकतील.

केवळ आंतरजातीय लग्न केले की जात मोडते असे दिसत नाही. दोन भिन्न जातीय कुटुंबांची सरमिसळ व्हायला मदत होऊ शकते. पण पुरुषप्रधान व्यवस्था या लग्नांना जातिनिर्मूलनाकडे जाताना रोखते असे दिसते. एकतर, लग्न नवऱ्याच्या धर्म वा रिवाजाप्रमाणे होते. दुसरे म्हणजे, मुलांना जात व आडनाव बापाचे लागते. आईच्या जातीचा व नावाचा, पर्यायाने अस्तित्वाचाच लोप इथे होतो.

महात्मा फुलेंचे एक अवतरण इथे नोंदवणे उद्‌बोधक ठरेल. ते असेः

'भूमंडळावर महासत्पुरुषांनी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरुन त्यांच्या समजुतीप्रमाणे काही ना काही सत्य आहे. यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तो धर्म स्वीकारावा. तिच्या पतीने बायबल वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे वाटल्यास ख्रिस्ती व्हावे व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास महंमदी धर्मी व्हावे आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे. कोणी कोणाचा द्वेष न करिता सर्वांना निर्मिकाच्या कुटुंबातील आहोत असे समजून प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांशी वर्तन करावे. म्हणजे ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होईल.' - महात्मा फुले (स्रोतः महात्मा फुले-धनंजय कीर, पान क्र.२८९-९०)

भिन्नधर्मीय सदस्यांच्या कुटुंबाविषयी महात्मा फुले यांनी सव्वाशे वर्षांपूर्वी पाहिलेले हे स्वप्न आजही स्वप्न आहे. असे काही होऊ शकते, व्हायला हवे हे आंतरजातीय लग्नांच्या पुरस्कर्त्यांच्याही डोक्यात येत नाही. हे जाणीवपूर्वक प्रचारणे गरजेचे आहे.

आज महात्मा फुलेंचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या दृष्टीने संविधान व कायदेही मदतीला आहेत. त्यांचा वापर करायला हवा. मुलाची जात न लिहिणे, आडनाव न लिहिणे. नाव लावताना 'मूल+आई+वडील' असे लावायला हवे. म्हणजे हे मूल पुढे मोठे झाल्यावर त्याच्या मुलाचेही नाव असेच ठेवेल. लग्न विशेष विवाह कायद्याखाली नोंदणी पद्धतीने व साधेपणाने करणे. धार्मिक विधी नको. धार्मिक पद्धतीने लग्न करताना जोडीदाराचे (इथे बहुधा वधूच म्हणजे मुलगीच असते, तिचे) धर्मांतर करणे बंद करायला हवे. जोडीदार निवडताना या मंडळींनी त्यांचा धर्म पाहिलेला नसतो. त्यांना ती व्यक्ती आवडते. त्यात धर्माचा हस्तक्षेप का करायचा?

भारतीय संविधानातील तरतुदी हा काही फक्त कोर्टकचेऱ्यांचा वा कायदेशीर मामला नव्हे. भारतीय म्हणून आपले जीवन अधिक उन्नत, निकोप करण्याचेही ते साधन आहे. घटनेतील मूल्ये हा आपल्या जीवनाचा मूलाधार होणे गरजेचे आहे. व्यक्तीच्या जगण्याला अधिक समृद्ध करणे, नीतिमान करणे हे धर्माचे काम हवे. दोन तरुण माणसांना त्यांच्या पसंतीने जोडीदार निवडण्यात, संसार करण्यात धर्माने अडसर ठरता कामा नये. आध्यात्मिक बाबतीतच धर्माने माणसाला मदत करावी. त्याच्या विवाहासारख्या नात्यांचे नियंत्रण फक्त घटनेला करू द्यावे. आज या तरतुदी घटनेत आहेत. पण समाजमन त्या स्वीकारण्याच्या दिशेने तयार करणे हे मोठे प्रबोधनाचे काम करायला लागणार आहे. तसेच ज्यांना कळते त्यांनी आपल्या कृतींनी उदाहरणे घालून देणेही तितकेच निकडीचे आहे.

❑

# ॲग्री इंडियन गॉडेसेस...

■ श्रुती गणपत्ये

राइट अँगलच्या सौजन्याने

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अमेरिकेमध्ये # मी टू ही चळवळ सुरू झाली आणि त्याचे पडसाद काही काळाने वेगवेगळ्या देशांमध्ये उमटू लागले. गेला आठवडाभर भारतातही या # मी टूची सुरुवात झाली आणि अनेक महिलांनी त्यांच्यावरील लैंगिक अत्याचार, शोषण, छळवणुकीच्या कथा सांगून समाजाला हादरवून सोडलं. बॉलीवूड अभिनेत्री तनुश्री दत्ताने याची सुरुवात केली आणि माध्यमांमध्ये अनेक महिला पत्रकारांनी आपल्या कहाण्या पुढे आणल्या. काहींनी नावासह त्या पुरुषांवर आरोप केले, काहींनी आधी तक्रार करूनही संबंधित संस्थेकडून कशी मदत झाली नाही याची वाच्यता केली. गेला आठवडाभर एकामागोमाग आलेल्या या लैंगिक छळवणुकीच्या बातम्यांची दखल काही संस्थांना घ्यावी लागली. थोड्या पुरुषांवर कारवाई झाली, काहींची सुरू असलेली दुष्कृत्य जगजाहीर झाली. अनेकांनी जाहीर माफी मागितली. पण अगदी अल्पकाळातच प्रसिद्धीच्या शिखरावर गेलेली ही चळवळ त्याच वेगाने खालीही आली आणि त्याचा सकारात्मक परिणाम निर्माण करण्याऐवजी समाजामध्ये विशेषत: पुरुषांमध्ये दहशतीचं वातावरण निर्माण करू लागली आहे. लैंगिक छळ हा केवळ स्त्री विरुद्ध पुरुष असा लैंगिक लढा नाही. त्यामध्ये भांडवलशाही, फॅसिस्ट मनोवृत्तीही कारणीभूत आहेत. मात्र # मी टू ला अतिप्रमाणात एका दिशेला खेचून या चळवळीच्या उद्देशाविषयीच आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

भारतीय माध्यमं जिथे इतर क्षेत्रांपेक्षा अधिक स्वातंत्र्य असल्याचं मानलं जातं, अधिक मोकळेपणा असल्याचं बोललं जातं. स्त्री असो वा पुरुष बरोबरीने तेवढ्याच जबाबदारीचं काम अगदी अहोरात्र, कधी एकट्याने करतात हे माध्यमांचं वैशिष्ट्य आहे. अशा वेळी स्त्री-पुरुष समानता किंवा किमान इतर क्षेत्रांपेक्षा महिलांच्या प्रती जास्त समजूतदारपणा असणं अपेक्षित मानलं जातं. पण ते चित्र खोटं असल्याचं काही महिला पत्रकारांच्या अनुभवावरून दिसून आलं. बाईला गृहीत धरण्याची पुरुषी मानसिकता, सत्तेचा गैरवापर, हाताखालच्या बाईचं शोषण करणाऱ्यांची थेट नावंच या महिलांनी जगासमोर आणली. # मी टूच्या काही तक्रारी या इतर पुरुष सहकाऱ्यांना माहित होत्या. पण त्यांनीही त्याची दखल घेतली नाही किंवा योग्य वेळी कारवाई केली नाही. उलट त्या बाईलाच नोकरी सोडावी लागली किंवा मनस्ताप पदरी आला आणि तिची लैंगिक छळवणूक करणारा मात्र नवनवीन बाया अत्याचारासाठी शोधत राहिला अशीही काही प्रकरणं पुढे आली. पत्रकार म्हणून वावरताना इतरांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या लेखणीचा वापर होतो पण जेव्हा पत्रकार महिलांच्या समस्या विशेषत: लैंगिक छळवणुकीच्या अशा सामुदायिक पद्धतीने क्वचितच बाहेर येतात. महिलांनी त्यासाठी आवाज उठवला ही मोठी गोष्ट आहे. अनेकांनी त्यावर टीकाही केली की,आजच का, जेव्हा घडलं तेव्हा का नाही बोललात? याचं खरं कारण हे प्रश्न विचारणारा समाजच आहे. आपल्यावरील लैंगिक छळवणूक विशेषत: उच्च पदावरील पुरुषाकडून होणारी सांगायला हिंमत लागते आणि ती तक्रार नोंदवून त्याचा पाठपुरावा करायला आजूबाजूच्यांचा पाठिंबा लागतो. पण भारतासारख्या समाजामध्ये जिथे बलात्कारालाही बाईच दोषी असं मानलं जातं तिथे लैंगिक छळवणुकीलाही तीच दोषी ठरवली जाते. गुन्हेगार पुरुष मात्र त्यात नामानिराळा राहतो. त्यामुळे तिने दहा वर्षांनी जरी आपल्यावरील अत्याचार उघड केला तरी तो अत्याचारच असतो हे लक्षात

घ्यायला हवं. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक ही नवीन गोष्ट नाही. याआधीही ती होत होती आणि कदाचित पुढेही होत राहील. पुढे आलेल्या घटना या केवळ एका लहान समूहापुरत्या मर्यादित आहेत.

या चळवळीची पार्श्वभूमी द्यायची तर ऑक्टोबर २०१७ मध्ये सोशल मीडियावर रोझ मॅकगोवन आणि शलेजूड या दोन अभिनेत्रींनी हार्वे वाईन्स्टाईन या हॉलीवूडमधील प्रथितयश निर्मात्यावर काम देण्याच्या बदल्यात आपला लैंगिक छळ केल्याचा आरोप न्यूयॉर्क टाइम्समध्ये केला. या दोघींच्या पाठोपाठ अनेकींनी पुढे येत हार्वेने आपलाही लैंगिक छळ केल्याचा आरोप केला. हे आरोपसत्र सुरू असतानाच आलिसा मिलानो हिने जगभरच्या महिलांना आवाहन केलं की त्यांनी 'मी टू' हा हॅश टॅग वापरण्याचं आव्हान केलं आणि आणखी कहाण्या पुढे आल्या.

आता भारतात तनुश्री दत्ता आणि बॉलीवूडपासून सुरुवात करून हा # मी टू आता माध्यमांपर्यंत पोहोचला आहे. महिलांनी एकत्र येऊन पुरुषी समाज व्यवस्थेविरोधात आवाज उठवण्यापर्यंत हे ठीक होतं. पण जेव्हा एखाद्या आंदोलनाला यश मिळतं तेव्हा ते अधिकाधिक व्यापक व्हावं अशी अपेक्षा असते. पण हे आंदोलन केवळ पुरुषांची नावं सोशल मीडियावर जाहीर करून त्यांच्यावर आरोप करण्यापर्यंत मर्यादित राहिलेलं दिसतं. त्यामुळे याचा उद्देश पूर्णपणे भरकटला आहे. कायद्याची वाट न चोखाळता पुरुषांची बदनामी सुरू झाली आहे. ही चळवळ केवळ इंग्रजी माध्यमातील महिलांपुरती मर्यादित राहिली. भारतामध्ये प्रत्येक राज्यात त्या त्या भाषेची विशेषत: हिंदी भाषेतील माध्यमं जास्त प्रभावशाली असताना तेथील कोणत्याही महिला पत्रकाराने ट्विटरवर तक्रार केलेली नाही. याचा अर्थ तिथे लैंगिक छळवणूक होत नाही, असं मुळीच नाही. पण त्या आपला लढा कायदेशीर मार्गाने लढत आहेत. त्यामुळे # मी टू इंडिया ही चळवळ अपूर्ण राहिली. इंग्रजी माध्यमातील महिलांनीही इतर भाषिक महिला पत्रकारांना त्यापद्धतीचं आव्हानही केलं नाही. ज्या महिलांवर हे अत्याचार किंवा ज्यांच्याबरोबर ही गैरवर्तणूक झाली त्यातील काहींना उशिरा का होईना न्याय मिळाला. त्यामुळे मग ही त्यांचीही जबाबदारी होती की इतर अशा अत्याचारित महिलांना विश्वास देणं आणि बोलतं करणं. पण ते झालेलं नाही.

भारतातील स्त्रीवादी चळवळ ही केवळ शोषित-वंचित महिलांच्या अत्याचारांपुरती मर्यादित राहिली आणि त्यामुळे मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीय महिलांना त्यांच्यावरील अत्याचारांच्या विरोधात # मी टू सुरू करावी लागली, असं एक कारण दिलं जात आहे. पण कार्पोरेट बाजारव्यवस्थेचे सगळे फायदे या महिलांनी त्यांचं करिअर करण्यासाठी घेतले आहेत. भांडवलशाही समाजात वावरताना आणि भांडवली प्रसार माध्यमांमधून काम करताना स्त्रियांनाही वरच्या पदावर जाण्याचं ध्येय असतं. त्यासाठी भांडवलशाही व्यवस्थेतील प्रत्येक तडजोड करायची त्यांची तयारी असते. मग अगदी दुसऱ्या महिलेचा त्यासाठी बळी गेला तरी चालेल. या महिला खरंतर अनेक ठिकाणी उच्च पदावरही आहेत. महिला उच्च पदावर गेल्या की, त्याच्या बातम्या होतात, त्यांचं कौतुक होतं. त्यामागे उद्देश हा असतो की त्यांनी तेथील पुरुषी मानसिकता, महिलांचं शोषण करणारी भांडवली व्यवस्था बदलायला हवी. पण उच्च पदावर गेल्यावर या महिलांनी तसं केलं का? नक्कीच नाही. त्यांनी आपल्याला फायदा होईपर्यंत सुरू असलेली व्यवस्था तशीच ठेवली. आज जेव्हा त्या व्यवस्थेचा एक फटका त्यांना बसला तेव्हा त्यांनी लगेच सोशल मीडिया हाताशी धरून कायदाच हातात घेतला. वरिष्ठ अधिकाऱ्याबद्दल तक्रार करताना भीती वाटणं, ती लढाई शेवटपर्यंत लढणं हे कठीण आहे पण या शिकलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या महिलांसाठी हे अशक्य नाही. ट्विटरवरून अनेक पुरुषांची नावं तर जाहीर झाली. पण किमान त्यानंतर तरी महिलांनी त्यांच्याविरोधात तक्रारी नोंदवल्या का? खूपच कमी जणींनी ते केलं. त्यामुळे यातील किती प्रकरणं ही खरी आहेत हे अद्याप समजलेलं नाही.

उलट याचं स्वरूप 'विच हंटिंग'सारखं होऊ लागलं आहे. लैंगिक अत्याचार, छळवणूक म्हणजे नक्की काय हे समजून न घेता अनेकींनी वैयक्तिक चॅट उघड करून आपणही पीडीत आहोत हे दाखवण्याचा प्रयत्न केला तो अगदीच हास्यास्पद होता. जणू काही स्वत:ला पीडित जाहीर करण्याची चढाओढ लागली आहे. एखाद्या पुरुषाने एखाद्या बाईला जेवणासाठी, बाहेर येण्यासाठी विचारणं, आपल्याला ती आवडते म्हणून सांगणं किंवा अगदी प्रेम व्यक्त करणं या गोष्टी लैंगिक छळवणूक आहेत का? एकदा या गोष्टींसाठी समोरच्या पुरुषाला नकार दिल्यावरही तो तेच टुमणं लावत असेल तर त्याला छळवणूक म्हणता येऊ शकते. एकीकडे समलिंगी संबंधांना मिळालेली मान्यता, विवाहबाह्य संबंधांचं गुन्हेगारी स्वरूप काढून टाकणं या गोष्टींचं भारतीय माध्यमांनीच प्रचंड कौतुक केलं, त्याला पाठिंबा दिला. मग स्त्री-पुरुष संबंधांबाबत प्रश्न येतो तेव्हा कधी कधी एकदम टोकाची भूमिका घेऊन सगळेच पुरुष नालायक आहेत असं म्हणण्याला काहीच अर्थ नाही. जर एखाद्या मुलीने मुलाला कॉफी प्यायला येतोस का, असं विचारलं तर मग उलटी छळवणूक म्हणायची का? लैंगिक छळवणुकीचे काही आरोप तर तद्दन खोटे निघाले. ज्या ट्विटर अकाउंटवरून हे आरोप केले होते तशा कोणी मुली अस्तित्वातच नाहीत, असं तपासाअंती पुढे आलं. त्यामुळे ही चळवळ आणखी बदनाम झाली. आपापसांतील भांडणं, जुनी प्रेम प्रकरणंही विनाकारण चव्हाट्यावर आली. निधी राजदान, सीमा मुस्तफासारख्या ज्या महिला पत्रकारांनी या चळवळीतील चुकीचे प्रवाह दाखवून देण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावरही टीका झाली.

मुळातच समाज माध्यमं कितीही प्रभावी असली तरी ती लोकांपर्यंत पोहोचायला भारतासारख्या देशात त्यांना एक मर्यादा आहे. ते माध्यम आहे हे लक्षात न घेता तेच तपास यंत्रणा, तीच न्याय

व्यवस्था, तीच समाज व्यवस्था आहे असं व्हर्च्युअल जगात वावरणारे मानतात आणि त्यामुळेच सोशल मीडियावर चालणाऱ्या चळवळी वगैरे या हवा असणाऱ्या फुग्याप्रमाणे फुगतात आणि काही दिवसांनी फुग्याची हवा निघून जाते तशा संपूनही जातात. अमेरिका आणि युरोपमध्ये जेव्हा या चळवळीला सुरुवात झाली तेव्हा तिथेही त्याचं स्वरूप हे अधिकाधिक बीभत्स होत गेलं. या चळवळीला फॅसिस्ट म्हणूनच संबोधण्यात आलं. कारण कोणताही कायदा न मानता केवळ ट्विटर किंवा फेसबुकच्या माध्यमातून पुरुषांवर आरोप करून बायका दुसऱ्यांनी काही कारवाई करावी म्हणून शांत राहिल्या. त्यांनी कायदा हातात घेऊन अनेक पुरुषांची बदनामी केली आणि त्यांच्या मनात भीतीही निर्माण केली. आज भारतातही तीच परिस्थिती आहे. पुरुषांना बायकांशी बोलायची भीती वाटते, अनेकांनी आपले जुने चॅट, फेसबुकच्या कमेंट हिस्टरीमध्ये जाऊन तपासून पाहिल्या की तेव्हा काही आक्षेपार्ह विधान त्यांनी चुकून केलं तर नव्हतं. या चळवळीने एक दहशत निर्माण करण्याचं काम करून कायदा कुचकामी आहे आणि आम्हीच कसं पुरुषांना वठणीवर आणू शकतो, असा एक पवित्रा घेतला. त्यामुळे लैंगिक छळवणुकीला वाचा फोडण्यासाठी ही चळवळ सुरू झाली तरी ती फॅसिस्ट मार्गाने जाऊन तिने आपला उद्देशच गमावला.

साधारण १९६० मध्ये अमेरिकेमध्ये रॅडिकल फेमिनिझमला सुरुवात झाली होती. त्या वेळीही पुरुषांना समाजातून मारून टाकून केवळ स्त्रियांचा समाज बनवायचा इथपर्यंत अजेंडा जाहीर करण्यात आला. त्याला 'स्कम' अजेंडा म्हणतात. हा अजेंडा कसा फॅसिस्ट विचारसरणीचा भाग आहे, हेसुद्धा त्या वेळी अनेक विचारवंतांनी दाखवून दिलं होतं. # मी टूनेही त्याच पद्धतीने माध्यमातील सर्व पुरुषांना संशयाच्या नजरेने बघायला सुरुवात केली आणि त्यांच्यामध्ये दहशत निर्माण केली आहे. उत्तर प्रदेशमधल्या अशिक्षित बायकांनी पुरुषी अत्याचाराला कंटाळून काठी हातात घेऊन गुलाबी गँग सुरू केली तर त्यांचा राग समजू शकतो. या बायका पोलीस, न्यायव्यवस्था यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत म्हणून त्यांना स्वसंरक्षणासाठी हिंसक मार्ग स्वीकारावा लागतो. पण उच्चशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या बायकांनी कायदा हातात घेण्याचं काहीच कारण नाही. कायदेशीर मार्गाने जाऊन गोष्टी पूर्ण नाही झाल्या म्हणून ट्विटरच्या माध्यमातून त्या आम्ही करत आहोत, हे मुळातच देशाची संविधानिक चौकट न मानण्याचं लक्षण आहे आणि म्हणून ते फॅसिस्ट आहे. देशातील अनेक गोरगरिब, व्यवस्थेने पिचलेले आणि शोषित असलेलेही याच संविधानावर आणि न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवून वर्षानुवर्ष न्यायालयीन लढाई देतात हे या उच्चशिक्षित महिलांनी नजरेआड करून चालणार नाही. याआधीही बजरंग दलाविरोधात बायकांनी प्रमोद मुतालिकला 'पिंक चड्डी' भेट म्हणून पाठवल्या आहेत. बायकांच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्हं उपस्थित करणाऱ्यांविरोधात 'स्लट वॉक' केला आहे. बायकांना दिवसाच्या कोणत्याही वेळी शहरात कुठेही मोकळेपणाने फिरता यावं म्हणून 'वाय लॉइटर'ची चळवळ बायकांनी केली. हॉस्टेलमध्ये राहताना महिलांना पाळाव्या लागणाऱ्या वेळा आणि केवळ महिला म्हणून असलेले नियम चुकीचे आहेत हे दाखवण्यासाठी त्यांनी 'बेखौफ आजादी' आणि 'पिंजरा तोड'चं कॅम्पन केलं. पण यामध्ये कुठेही कायदा हातात घेण्यात आला नाही. लोकशाही मार्गाने निदर्शनं करून, सोशल माध्यमांमधून जागरूकता निर्माण करून या चळवळी झाल्या. त्या चळवळींचा आजच्या # मी टू एवढा गवगवा झाला नाही. कारण मुळातच फॅसिस्ट अजेंड्याची ती एक खासियत आहे की त्यांची जाहिरातबाजी ही जोरदार असते आणि काही तरी सॉलिड क्रांती यातून होणार असा आविर्भाव त्यात असतो. पण प्रत्यक्षात मात्र थोड्या प्रसिद्धीच्या पलीकडे काही घडत नाही आणि लोकशाही व्यवस्थेला मात्र कायमस्वरूपी तडे जातात.

आता प्रश्न उपस्थित होत आहे की, ही # मी टू चळवळ आताच का सुरू झाली? तर याचं सर्वात मोठं कारण आहे सध्याचं फॅसिस्ट सरकार आणि त्यामुळे समाजात निर्माण झालेलं वातावरण. एकतर उजव्या विचारसरणीला कोणत्याही सामाजिक कामाची पार्श्वभूमी नाही. उदाहरणार्थ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने विविध घटकांना आकर्षित करण्यासाठी आदिवासी कल्याण आश्रमापासून महिलांसाठी दुर्गा वाहिनी, मजुरांसाठी भारतीय मजदूर संघ अशा संघटनांचं जाळं उभं केलं. पण एवढ्या वर्षांत त्यांच्या प्रश्नांवर या संघटनांनी लढा दिल्याचं कधीच पाहायला मिळालं नाही. दुर्गा वाहिनीसारख्या संघटनांमध्ये महिलांना लाठी-काठीचं प्रशिक्षण दिलं जातं आणि संघाच्या इतर महिला संघटना कौटुंबिक कामं करण्यासाठीही महिलांचे वर्ग घेतात. अशा वेळी मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीय महिलांना # मी टूसारखा अजेंडा उजव्या बाजूला आकर्षित करू शकतो. एखाद्या महिलेने एखाद्या पुरुषावर आरोप लावला तर ते सिद्ध करण्याची तसंच ते पुरावे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी त्या महिलेचीही असते. पण इथे मात्र तक्रार करून ती बाई नामानिराळी राहते आहे. खूपच कमी महिलांनी पुढे येऊन माध्यम संस्थांकडे तक्रारी नोंदवल्या आहेत. एअर कंडिशन ऑफिसमध्ये बसून ट्वीट करून क्रांतीच्या भाषा काँग्रेस सरकारच्या काळात भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातही झाल्या. त्याची परिणती काय झाली तर भाजपचं सरकार सत्तेत आलं. आताही लोकसभा निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असताना देशातील जीवन-मरणाचे प्रश्न बाजूला पडले असून लैंगिक अत्याचार हीच देशातली एकमेव समस्या झाली आहे, असं दृश्य निर्माण झालंय. भ्रष्टाचाराच्या आंदोलनाच्या वेळी जगामध्ये भारताची कशी बदनामी होत आहे, असं भाजपवालेच विरोधी पक्षात बसून ओरडत होते. पण आता सत्तेत आल्यावर लैंगिक छळवणूक प्रकरणांवरच जर समाज चर्चा करणार असेल तर सरकारच्या दृष्टीने त्यांचं अपयश झाकायला हे उत्तम आहे.

❐

# सुकरवाट

■ वृषाली मगदूम

दूरदर्शनवरील मालिका व महिला हा एक सातत्यानं चर्चिला जाणारा विषय आहे. मालिका बघण्याच व्यसन महिल्यांच्यात इतकं वाढत चाललं आहे की, त्यातून त्यांना कशालाही वेळ मिळत नाही. समाजात मिसळण्याची प्रक्रिया थंडावत चालली आहे. किंबहुना मालिका पाहात असताना घरात चुकूनमाकून कोणी आले तरी महिलेला मोठा अडथळा वाटतो. मैत्रिणीला भेटणे सुख, दु:खाच्या गप्पा मारणे. आजूबाजूच्या परिस्थितीचे अवलोकन करणे, त्यावर भाष्य करणे सारेच थांबले आहे. एका अर्थानं विचार करण्याची शक्ती थंडावली आहे. मन मठ्ठ झालं आहे. अन् हे सारे एका दूरदर्शनवरील मालिकाने झाले आहे. दूरदर्शनवर बातम्या असतात. वैचारिक चर्चा असतात. आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवर भाष्य असते. पण मालिकांशिवाय महिला इतर काहीही पाहात नाहीत. बातम्या पाहणे ही पुरुषांची मक्तेदारी व मालिका पाहणे हा स्त्रियांचा जन्मसिद्ध हक्क असे चित्र आपणाला पाहायला मिळते.

स्त्रियांना वाटते मालिका पाहून आपणाला आनंद मिळतो, आपली करमणूक होते. दिवसभर काम करून शरीर मन थकलेले, त्रासलेले असते त्याला विसावा मिळतो. पण हा आनंद क्षणिक असतो. त्या आनंदातून काही मिळत नाही. उलट एवढा वेळ आपण या इडियट बॉक्सपुढे बसून मालिका मागून मालिका बघत होतो. याचा स्त्रियांना पश्चात्तापही होतो. यापुढे दूरदर्शन बघायचे नाही असा त्या निश्चयही करतात. पण दुसऱ्या दिवशी 'येरे माझ्या मागल्या' सुरू होते.

स्टार प्रवाह, कलर्स मराठी, झी मराठी आता युवा व सोनी आले. म्हणजे मालिकांना तोटा नाही. 'तुझ्यात जीव रंगला', 'तुला पाहते रे', 'माझ्या नवऱ्याची बायको' यासारख्या अतिरंजित, आपल्या दैनंदिन जीवनापासून दूर नेणाऱ्या या चित्रणात महिला रंगून जातात व मालिकांचा टीआरपी वाढवतात. जितक्या मालिका अतिरंजित वास्तवापासून दूर जाणाऱ्या तितका टीआरपी जास्त. स्मिता तळवळकर साहित्य संमेलनात एका भाषणात म्हणाल्या होत्या, दूरदर्शनचा रिमोट कंट्रोल तर महिलांच्या हातात असतो. काय बघायचे, काय नाही, बघायचे हे त्यांनीच ठरवायचे आहे. पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. कारण रिमोट महिलांच्या हातात आहे. पण मन हातात नाही ना. याचा इतका अतिरेक होतो की, घरी आलेल्या परिचित व्यक्तीशीही महिला बोलत नाहीत. पाहुणेही निमूटपणे टी. व्ही. बघत बसतात ब्रेकमध्ये संभाषण होते. ब्रेक संपला की परत संभाषण बंद होते. आजकाल तर घरी जाणे - येणे भेटणेही बंद झाले आहे. फोन केल्याशिवाय कोणी कोणाला भेटायला जात नाही.

स्त्रियांची जीवनाची दिशा बदलण्याची ताकद या मालिकांमध्ये आहे का? एवढा महिला वर्ग, लेचापेचा आहे का? मालिकांच्या अधीन होताना मन, बुद्धी, विचारशक्ती गहाण पडत आहे का? १९९० सालापर्यंत मालिका, प्रसारमाध्यमे यांचा अतिरेक नव्हता. खासगीकरण झाले नव्हते. मनोरंजन हा मालिकाचा हेतू नव्हता. पण आज प्रसारणमाध्यमाचा व्यवसाय झाला आहे. महिलांना मोहिनी टाकणाऱ्या आकर्षित करणाऱ्या अवास्तव, भडक गोष्टी दाखवून सर्व वाहिन्या नफा मिळवत आहेत. जागतिकीकरणामुळे जगातल्या

सर्व मालिका येऊन धडकल्या आहेत. अवास्तव, अतिरंजित दाखवताना विधिनिषेधच राहिला नाही आहे. स्पर्धा चालू आहे. त्यामुळे दूरदर्शनसारखे प्रभावी माध्यम बेजबाबदारपणे हाताळले जात आहे याचा सर्वात जास्त फटका महिलांना बसत आहे. समस्त स्त्री वर्गाचा हा पराभव आहे, असे मला वाटते.

एका घरात मी गेले असता घरातील गृहिणी मला अभिमानाने साडेपाचपासून ती मालिकादर्शन घेते हे सांगत होती. रिपिट टेलिकास्ट कसे बघते हे सांगत होती. घरगुती चक्की असणाऱ्या एका महिलेकडे मी दळण घेऊन गेले. तर ती बिग बॉस बघत होती. 'आता नाही संध्याकाळी या म्हणाली. बिग बॉसमध्ये तिला अडथळा नको होता. मी लांबून आलेय व मी थांबते असे म्हणत तिने दिलेल्या खुर्चीवर बसून मीही बिग बॉस बघू लागले. मग तिला हे बघायला का आवडते ती उत्साहाने सांगू लागली. टी. व्ही. बघत ती भेंडीही चिरत होती. मालिकांचे एवढे वेड महिलांना असते, की दूध उतू गेले, भाजी करपली तरी भान नसते. स्त्रियांना मालिका बघण्याचे व्यसन लागले आहे, व्यसनी जसा दारू, तंबाखू, गुटखा खातो. नशा उत्तरली की त्याला पश्चात्ताप होतो. सोडायची प्रतिज्ञा करतो. पण इच्छा झाली की परत नशा करतो. मालिका बघण्याचेही तसेच आहे. हे दुष्टचक्र आहे. यातून महिला बाहेर येत नाहीत व निर्मात्यांना त्याचा फायदा होतो.'

पुढचे पाऊलमधील कल्याणी लॅपटॉप पाण्यात बुडवून साबणाने धुऊन काढते आणखी एका मालिकेत नायक मरून परत जिवंत होऊन येतो. मालिकामध्ये ड्रॉइंग हॉलमध्ये बसून स्त्रियांची खलबते चालू असतात. नायिका दुबळी, अबोल, आज्ञाधारक अन्याय सहन करणारी असते. तर खलनायक किंवा खलनायिका सतत कटकारस्थान करत असते. लग्न समारंभातील साड्या या महिला घरी नेसत असतात. दागिन्यांनी नखशिखांत नटलेल्या असतात. पुरुषप्रधान संस्कृती, पारंपारिकतेचा अभिमान, अन्याय, हिंसाचार सहन करणारी नायिका असे चित्र दाखवले जाते ते काल्पनिक आहे. दोन घटका करमणूक होते. डोक्याला तेवढाच विसावा असे महिला म्हणतात ते अतिशय चुकीचे आहे. मालिकांमधून महिलांना जी अवमानकारक वागणूक दिली जाते ती स्त्रियांच्या लक्षात येत नाही का?

खासगी प्रसारमाध्यमावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा पातळीवर केबल नेटवर्किंग नियंत्रण समिती आहे. माध्यमांना राज्यघटनेच्या चौकटीत राहून चित्रण करणे बंधनकारक आहे. ही चौकट भेदणारे अंधश्रद्धा, असमानता, लिंगभेद, सर्वधर्मसमभाव नसणारे चित्रण करणेस वाहिन्यांना परवानगी नाही सामान्य माणूससुद्धा साध्या पोस्टकार्ड वर जिल्हा पोलीस स्टेशनला या वाहिनीविरोधात तक्रार करू शकतो. पण आपण यातले काहीच करत नाही व वाहिन्या सर्व नियम धाब्यावर बसवतात. महाराष्ट्रात महिला आयोगाने स्त्रीविरोधी चित्रण करणाऱ्या जाहिराती व मालिकांना दुर्योधन व राक्षस पुरस्कार दिला होता. एका हिंदी मालिकेत डॉक्टर मुलगा होणार असे सांगतात. तेव्हा या विरोधात या मालिकेवर जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. सर्व लोकप्रिय मालिकांमध्ये घराच्या चार भिंतीत कुटुंबकलहाचे राजकारण करणाऱ्या महिला आहेत. नायिका पतिपरायण, सोशिक व पारंपरिक असतात. कपटी, पाताळयंत्री एखादी स्त्री असतेच, जी समस्त महिला वर्गाला आवडते. स्वतंत्र विचाराच्या तरुणीला सुतासारखे सरळ कसे करायचे. तिचा नक्षा कसा उतरावयाचा हे दाखवले जाते. मालिकांमधून स्त्रियांना पैसा, रूप, आलिशान गाडी, बंगल्याचे लालूच दाखवून वश करून घेता येते. मालिकांमध्ये स्त्री स्वत:ला जे हवे ते कष्टाने मिळवत नाही. इच्छापूर्तीसाठी पुरुषाच्या मागे लागल्याचे दाखवले जाते. सर्वच मालिकांमधून घरकाम करणे, सुंदर दिसणे, त्याग करणे, घरातील पारंपरिक रीतिरिवाज सांभाळणारी स्त्री दाखवतात. वडाची पूजा करणारी, सारे सण, परंपरा सांभाळणारी स्त्री सर्वच मालिकांमधून दाखवली जाते. तिचे अस्तित्व, घराची साफसफाई नवऱ्याची देखभाल एवढ्या पुरती सीमित असते. **१९७५ पासून स्त्रियांच्या पारंपरिक दृष्टिकोनाला छेद देणारे कायदे आले. पण याची मालिकांनी दखलही घेतली नाही.**

लेखाचा समारोप करताना मला समस्त महिलांना सागावंसं वाटतं आता साऱ्यांनी कंबर कसली पाहिजे. मालिकांच्या या मोहमयी जाळ्यातून बाहेर पडले पाहिजे. स्त्री म्हणून आपणही समृद्ध बौद्धिक खुराक देणारं गुणवत्तापूर्ण जीवन जगू शकतो. ज्यासाठी थोडे हातपाय हलवावे लागतील. धडपड करावी लागेल. सोफ्यावर रेलून माध्यमाचा रिमोट दाबण्याइतके सोपे ते नक्कीच नाही. निर्मात्यांनी काय द्यावे. चॅलेनवाल्यांनी काय दाखवावे. अभिनेत्रींनी कोणत्या भूमिका स्वीकाराव्यात हे सांगण्यापेक्षा आम्ही कशात आनंद घेणार आहोत हे ठरविण्याची वेळ आली आहे. स्वत:च्या मनाचा आतला आवाज इडियट बॉक्ससमोर बसणं बस्स झालं अस्स स्वत:ला खडसावीत स्वत:मधील ताकद ओळखून तिचा विधायक कामासाठी उपयोग करणं व तसा निश्चय करणं आवश्यक आहे. वाट अवघड वाटेल पण अमलात आणणं अशक्य नाही. हे शक्य केले तर समस्त महिलांची विकासाची, समतेची, समानतेची वाट सुकर व सोपी होईल.

❐

# अन्नपूर्णा परिवार वृत्त विशेष

■ **अंजली दिवाण पाटील**

अन्नपूर्णा परिवार हा ६ संस्थांचा समूह आहे. अन्नपूर्णामध्ये अनेक उपक्रम राबविले जातात. उदा. मायक्रो फायनान्स, मायक्रो इन्शुरन्स, पाळणा घरे, शैक्षणिक शिष्यवृत्ती, रिसर्च सेन्टर.

'संवाद' या त्रैमासिकाच्या माध्यमातून ही सर्व माहिती तुम्हा सर्वांसमोर थोडक्यात मांडली जाते.

१८ ऑगस्ट हा कॉ. दादा तथा नरेंद्र पुरव यांचा स्मृतिदिन.

कॉ. दादा पुरव हे अन्नपूर्ण परिवारचे प्रेरणास्रोत आहेत. कामगार चळवळीचे प्रणेते म्हणून ते ओळखले जातात. दादा अतिशय अभ्यासू व्यक्तिमत्त्व होते. अन्नपूर्णाच्या स्थापनेमध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी १८ ऑगस्टला दादा पुरव रिसर्च सेन्टरतर्फे पुस्तक प्रकाशित केले जाते.

**या वर्षी १८ ऑगस्ट २०१८ ला अन्नपूर्णातर्फे श्री. माधव दातार ह्यांनी लिहिलेले 'Future of public sectoer Banks in india' ह्या अतिशय माहितीपूर्ण पुस्तकाचे प्रकाशन झाले.**

या प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणे कॉ. देविदास तुळजापूरकर आणि कॉ. भालचंद्र कांगो हे चळवळीतील नेते उपस्थित होते. आपल्या वैचारिक भाषणात दोघांनीही आजच्या सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला. येत्या काळात किती सजगतेने ही परिस्थिती हाताळावी लागेल यावर भर दिला.

कॉ. तुळजापूर यांनी बँकांची परिस्थिती, घटलेले व्याजदर, सरकार बँकांचा उपयोग फक्त भांडवलदार लोकांसाठी कसा करीत आहे, सामान्य माणसाच्या जिवावर बँकिंग चालू आहे, पण त्याला त्याचा काही लाभ मिळत नाही या गोष्टींवर भर दिला.

कॉ. कांगो यांनी आजचे उजवे सरकार, त्यांचे भांडवलदार समूहाप्रति चांगली भूमिका आणि लोकशाहीचा होत असलेला ऱ्हास यावर भर देतानाच डाव्या चळवळी, कामगार चळवळी समोरची आव्हाने नमूद केली, आणि मनुष्यकेंद्रित समाज निर्माण व्हावा यासाठी अन्नपूर्णा कार्य करते असे नमूद केले.

अन्नपूर्णाच्या प्रमुख विश्वस्त कॉ. मेधाताई यांनी अन्नपूर्णा परिवाराच्या कामकाजाची माहिती दिली.

विश्वस्त व्ही. सी. जोशी यांचे सुद्धा या प्रसंगी समयोचित भाषण झाले. विश्वस्त सुरेश धोपेश्वरकर याच्या अध्यक्षीय भाषणानंतर व आभार प्रदर्शनानंतर पुस्तक प्रकाशनाचा समारंभ संपला.

१८ ऑगस्टला पुस्तक प्रकाशना समवेत अन्नपूर्णा परिवारची विश्वस्त मंडळाची त्रैमासिक मीटिंगही संपन्न झाली. यामध्ये बँकांचे सल्लागार, ऑडिट सल्लागार, परिवाराचे विश्वस्त, सभासद प्रतिनिधी, स्टाफ प्रतिनिधी, पाळणाघर प्रतिनिधी उपस्थित होते. मागील ३ महिन्यांतील कामकाजातील घडामोडींचा आढावा, नवीन बदलणाऱ्या नियमांची मंजुरी असे सर्व विषय मेधाताईंनी समोर मांडले. त्यावर चर्चा झाली, प्रश्न विचारले गेले आणि विविध प्रस्तावना मंजुरी घेतली.

८ ऑक्टोबर २०१८ रोजी अन्नपूर्णा परिवारच्या कर्मचारी वर्गाची मीटिंग झाली. त्या मीटिंगला HR मिटिंग म्हटले जाते. कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अनेक विषयांवर चर्चा झाली.

अन्नपूर्णा परिवाराचा एक भाग 'मायक्रो फायनान्स'. त्या अंतर्गत

ग्रामीण भागातील सभासदांना कर्ज वाटप केले जाते. हा कर्जपुरवठा काही सामाजिक उद्दिष्ट ठेवून काम करणाऱ्या संस्थांमार्फत दिला जातो.

इचलकरंजी येथील श्रमशक्ती, बीडची समता, पुणे येथील पर्वती, दिशा आणि सह्याद्री हे अन्नपूर्णाचे पार्टनर आहेत. त्यांच्या कामकाजासंदर्भात मीटिंग झाली. २० ऑगस्ट आणि २२ ऑक्टोबर रोजी त्यांच्या पुढील कर्जासंदर्भात, त्यांच्या कामातील अडचणी, तसेच कामातील वाढ यावर चर्चा झाली. मेधाताईंनी यावर त्यांना मार्गदर्शन केले.

मायक्रो फायनान्स अंतर्गत दर महिन्याच्या १ तारखेला कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे त्यांचे स्कील वाढते, नव्या गोष्टी शिकता येतात. माहितीची देवाण घेवाण होते व update होतें.

कर्मचाऱ्याप्रमाणेच सभासदांनाही व्यवसाय प्रशिक्षण, आर्थिक साक्षरताचे प्रशिक्षण दिले जाते.

महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सभासद मीटिंगमध्ये कर्ज मंजुरी घेतली जाते. मायक्रो इन्शुरन्स अंतर्गत दर ७ तारखेला सभासद प्रतिनिधींची सभा होते आणि आरोग्य क्लेमचे निर्णय प्रतिनिधी इथे घेतात.

जून-जुलै महिन्यात शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी अन्नपूर्णामधून २७ लाख रुपयांचे वाटप झाले.

अशा प्रकारे अन्नपूर्णा परिवार पारदर्शी कामकाज करते.

❒

# माझे मनोगत

## ■ श्रुतिका सुरेश साळवी, भांडुप-मुंबई

मी एक महिला आहे. त्याचा मला अभिमान आहे आणि हेच माझे स्वातंत्र्य आहे. आज २१ व्या शतकामध्ये स्त्री-पुरुष समानतेचा नारा पुकारला जातो. परंतु कीती स्त्रियांना स्वातंत्र्य आहे हे जाणून घेण्याची खूप गरज आहे. मी श्रुतिका सुरेश साळवी अन्नपूर्णाची गेली अनेक वर्षांपासूनची सभासद आहे. मला दोन मुले आहेत. एक मुलगा आणि एक मुलगी. पुढच्या भविष्यात माझ्या मुलांच्या शिक्षणावर भर दिला आहे. मी लग्नाच्या आधी एका छोट्या कंपनीमध्ये नोकरी करत होते. तेथे कमी पगाराअभावी मी दुसरीकडे नोकरी शोधत होते. नोकरी न मिळाल्यामुळे मी घरकाम करू लागले. घर सांभाळून मी घरकामही करते. स्वातंत्र्य मिळत नाही ते मिळवावे लागते. स्वत: प्रयत्न केल्याशिवाय तुम्हाला कोणी स्वातंत्र्य देऊ शकत नाही. अभिमानाने काम करण्याचे स्वातंत्र्य तुम्ही स्वत: मिळवू शकता. तो धीर मला माझ्या कामाच्या जिद्दीने मिळवून दिला आहे. त्यामुळे महिलांना स्वत:च खंबीर बनून हा लढा लढायचा आहे. अन्नपूर्णाची मी आभारी आहे की, त्यांनी मला माझ्या मनातील भावना व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करून दिली.

## पु. ल. म्हणतात -

**जगातले बरेचसे देश हिंडून आल्यानंतर माझी खात्रीच पटली आहे की, देवाचे आपल्या देशात जितके लाड केले जातात, तिकडे इतरत्र कुठेही होत नसतील. महाराष्ट्रात एवढा मोठा दुष्काळ पडला, तरी गणपतीच्या मोदकांची संख्या एकवीसच्या खाली आली नव्हती. प्रभादेवीच्या सिद्धिविनायकाच्या देवळातही दर मंगळवारी गर्दी वाढतच चाललेली दिसते. एके काळी हाच सिद्धिविनायक एकांतवासात असल्यासारखा होता. आता अंगारिकाला तर हजारा-हजारांच्या रांगा तिथे असतात. त्याच रांगा मग धान्याच्या दुकानापुढे, रॉकेलसाठी, साखरेसाठी व एम्प्लॉयमॅट एक्सचेंजपुढे लागतात. आणखी एक रांग बारा-साडेबाराच्या सुमारास आमच्या तळमजल्यावरच्या हॉटेलबाहेर लागते. अबालवृद्धांची रांग! हॉटेलची मुख्य दारे बंद झाल्यावर. प्रत्येकाला हातात अॅल्युमिनियमची भांडी, पत्र्याची डबडी, कागदाचे बॉक्सेस वगैरे काहीतरी असते. हॉटेलात शिल्लक राहिलेले अन्न त्या भांड्यांत पडते.**

**सिद्धीविनायक त्या ठिकाणापासून फार दूर नाही. तसा म्हणे तो सर्वत्र आहे! पण तिथे देवळात कदाचित कीर्तन रंगात आलेले असेल. बुवा त्याच वेळी भक्तांच्या संकटकाली भगवंत कशी धाव घेतात, या विषयावरचे अख्यान संकष्टीचा उपास सोडून आलेल्यांना साग्रसंगीत ढंगात सांगत असतील. माझ्या डोक्यात त्या देवळापुढील रांग आणि रोज मध्यरात्री ही अन्नब्रह्माच्या वाचनेसाठी लागणारी रांग, यातले काय खरे, खोटे याचे प्रश्न उभे राहत असतात.**

**- विज्ञाननिष्ठ सावरकर पुस्तिकेच्या सौजन्याने...**

# पितृ देवो भवो!

■ रोहिणी चव्हाण

वडील, पप्पा, डॅडी बोलायला किती छान वाटत नाही! पण आपण कधी कधी मुद्दामहून जाणूनबुजून बाबा अस म्हणतो. अशाच एका बापाची कहाणी! मातृ देवो भवो! पितृ देव भवो! हे अगदी सहज म्हटल जातं. पण त्यातील मातेला क्षणोक्षणी आठवल जातं पण पित्याला मात्र... कामापुरता, गरजेपुरतंच आठवाव लागत. कारण आई सकाळ पासून रात्री झोपेपर्यंत बरोबर असते. पण बाप मात्र सकाळ उजाडतोय कधी व आपल्या बायकापोरांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी काम धद्याला जायचे कधी याची वाट पहात असतो त्यामुळे महत्त्व आईलाच ठेच लागली की लगेचच तोंडातून आई गं, येते बाबा येत नाही. आई घरातच मांगल्य तरी वडील घराच अस्तित्व असत. हे वाचण्या बोलण्यासाठी ठीक आहे. पण त्या अस्तित्वाला आपण किती समजून घेतलय! वडीलांना महत्त्व असूनही त्यांच्या विषयी फारसे बोलले जात नाही. आपल्याला माहीत असतात ते फक्त मारणारे झोडणारे तापट वडील पण त्या मागील प्रेमाकडे आपले कायम दुर्लक्ष दु:खाच्या प्रसंगाला आईकडे अश्रुचे पाट असतात पण तीच्या सांत्वनाला पुढे सरकताना ते वडीलच आणि रडण्यांपेक्षा सांत्वन करण्यावर जास्त ताण असतो. कारण ज्योती पेक्षा समईच ज़ास्त तापते ना? पण श्रेय नेहमीच ज्योतीलाच दिले जाते. प्रसंगात सर्वांसमोर मोकळेपणाने आई रडु शकते पण रात्री उशीत तोंड खुपसून रडतात ते वडीलच स्वत:चे वडील वारले तरी रडता येत नाही कारण छोट्या भावंडाना जपायचे असते. पत्नीने अर्ध्यावरून साथ सोडली तरी पोरांच्या अश्रुवर आवर घालायचा असतो. जिजाऊनी शिवबांना घडवले असं आवर्जून म्हणाव. पण त्यावेळी शहाजीची ओढाताण लक्षात घ्यावी, देवळी, यशोदाच, कौतुक अवश्य कराव, पण भरपूरात पोराला टोपलीत घालून डोक्यावरून घेऊन नदीपार वडीलांची फाटकी बनियन पाहिली टाचा झीजलेल्या चपल्ला पाहिल्या की आपल्याला लाज वाटते. मुलाला वाढदिवसाला नविन ड्रेस प्रत्येक सणाला मुलीला बायकोला काय हवेत. पण स्वत: मात्र एकच शर्ट पँटवरच राहतील. मुलगा सलून मध्ये ५० रु.फोनची दाढी करतो, मुलगी पार्लरमध्ये ५०० रु. खर्च करते पण वडील मात्र घरीच दाढी करतात ती पण आंघोळीच्या साबणाने, आजारपण तर त्यांना स्पर्श करत नाही पण जर चुकून आजारी पडलेच तर दवाखान्यात जात नाहीत कारण डॉक्टर एखादा महिना घरात आराम करायला लावतील याची त्यांना भिती वाटते. कारण मुलांची शिक्षण व्हायची असतात. ज्या घरात वडील आहेत तेथे कोणीही वाईट नजरेने पाहू शकत नाही कारण घरातला कर्ता जिवंत असतो. आपल्या जिवनाला फक्त आई-वडीलांमुळे अर्थ असतो छोट्या संकटांना सामोरे जायाला आई चालते, पण मोठ्या वादळांना सामोरे जायला त्यांना झेलताना बापच आठवतो, लहानपणी वडील वारल्यावर अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यांना बाबांचे महत्त्व कळते. आज माझे बाबा असते तर...

अस हे सुंदर व्यक्तीमत्त्व त्याला कोटीकोटी प्रणाम.

❐











ANNAPURNA PARIWAR











भारतीय रिज़र्व बैंक
**RESERVE BANK OF INDIA**
DEPARTMENT OF NON-BANKING REGULATION

Seminar on "Evolution of Microfinance Sector - Reflections and Road Ahead"
November 20, 2018



अन्नपूर्णा परिवारतर्फे श्री सुरेश घोपेश्वरकर यांनी "संवाद त्रैमासिक" न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.